बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकःबाळासाहेब मस्के



बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के



बीड | रविवार,दि.१३ एप्रिल २०२५ | वर्षे४थे | अंक२४१वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३


# भारताच्या मोठ्या औषध कंपनीच्या गोदामावर रशियाने क्षेपणास्त्र डागले!

## लहान मुले अन् वृद्धांची औषधे नष्ट? युक्रेनचा दावा! ◆ नुकसानीची माहिती जाहीर केलेली नाही ◆ आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन म्हणून या हल्ल्याचा निषेध ◆ भारतीय व्यवसायांना जाणूनबुजून लक्ष्य केल्याचा दावा

पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली: कुसुम हेल्थकेअरच्या या गोदामात मानवी गरजांसाठी आवश्यक असलेले वैद्यकीय साहित्य ठेवण्यात आले होते. कीवने अद्याप जीवितहानी किंवा नुकसानीची माहिती जाहीर केलेली नाही, परंतु आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन म्हणून या हल्ल्याचा निषेध केला आहे. दरम्यान, या हल्ल्याबाबत रशियाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.युक्रेनमधील भारतीय औषध कंपनी कुसुमच्या गोदामावर रशियाने क्षेपणास्त्र हल्ला केल्याचा दावा युक्रेनने केला आहे. भारतीय व्यवसायांना जाणूनबुजून लक्ष्य केल्याचा दावाही त्यांच्याकडून करण्यात येतोय. युक्रेनममधील भारतीय दुतावासाने यासंदर्भात माहिती दिली आहे. युक्रेनमधील भारतीय औषध कंपनी कुसुमच्या गोदामावर रशियाने क्षेपणास्त्र हल्ला केल्याचा दावा युक्रेनने केला आहे. भारतीय व्यवसायांना जाणूनबुजून लक्ष्य केल्याचा दावाही त्यांच्याकडून करण्यात येतोय. युक्रेनमधील भारतीय दुतावासाने यासंदर्भात माहिती दिली आहे. युक्रेनमधील भारतीय दुतावासाने एक्स



पोस्टमध्ये म्हटलंय की, युक्रेनमधील भारतीय औषध कंपनी कुसूमच्या गोदामावर रशियाने आज क्षेपणास्त्र हल्ला केला. भारताबरोबर खास मैत्री असल्याचं सांगत मॉस्कोकडून सातत्याने भारतीय व्यवसायांना लक्ष्य केलंय जातंय. वृद्ध आणि लहान मुलांसाठी बनवण्यात येणाऱ्या औषधांना नष्ट करण्यात आलंय.कुसुम हेल्थकेअरच्या या गोदामात मानवी गरजांसाठी आवश्यक असलेले वैद्यकीय साहित्य ठेवण्यात आले होते. कीवने अद्याप जीवितहानी किंवा नुकसानीची माहिती जाहीर केलेली नाही, परंतु आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन म्हणून या हल्ल्याचा निषेध केला आहे. दरम्यान, या हल्ल्याबाबत रशियाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

### कुसुम कंपनी काय आहे?

कंपनीच्या वेबसाइटनुसार, कुसुम हा एक औषध कंपन्यांचा एक बहुराष्ट्रीय गट आहे ज्यामध्ये युक्रेन, भारत, मोल्दोव्हा, कझाकस्तान, उझबेकिस्तान, फिलीपिन्स, म्यानमार, मेक्सिको आणि केनियामध्ये २००० हून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. कुसुमद्वारे चार आधुनिक उत्पादन सुविधा दिल्या जातात. त्यापैकी तीन सुविधा भारतात असून एक युक्रेनमध्ये आहे.

कीवच्या पोस्टपूर्वी युक्रेनमधील ब्रिटनचे राजदूत मार्टिन हॅरिस यांनी हल्ल्याची माहिती दिली आणि हा हल्ला क्षेपणास्त्राने नव्हे तर रशियन ड्रोनने केला असल्याचे सांगितले. आज सकाळी रशियन ड्रोनने कीवमधील एका मोठ्या औषधांच्या गोदामाला पूर्णपणे उद्धवस्त केले, वृद्ध आणि मुलांसाठी आवश्यक असलेल्या औषधांचा साठा जाळून टाकला. युक्रेनियन नागरिकांविरुद्ध रशियाची दहशतवादाची मोहीम सुरूच आहे, मार्टिन यांनी वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

# अपघाताचा बनाव करुन केला अपहार!

## कारवाई:परळी पोलिसात दाखल झाला गुन्हा

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:मयुर प्रदीप कोकडवार, मयुर एजन्सी, जिंतूर यांना २५ टन सोयाबीन रिफाईन्ड तेलाची आवश्यकता असल्याने त्यांनी मला दिनांक १४/११/२०२४ रोजी तेल खरेदीची ऑर्डर दिली. त्यानुसार मी ए.डी.एम. ॲग्रो इंडस्ट्रीज, लातूर यांच्याकडून १२४२०० रुपये प्रति टन या दराने २५ टन तेल खरेदी करण्याचे ठरवले.सदर तेल जिंतूर येथे पोहोचविण्यासाठी जी.एम. लॉजिस्टिक, लातूर या ट्रान्सपोर्ट कंपनीशी संपर्क केला. त्यांनी मला चक४६ इण २७१० या टँकरद्वारे वाहतूक केली जाईल असे सांगितले. टँकर चालकाचे नाव राजेंद्र शिवाजी मुंडे असून त्याचा मोबाईल नंबर ७४९९०४०५७२ असा आहे.

दिनांक १७/११/२०२४ रोजी संध्याकाळी ५ वाजता ए.डी.एम. ॲग्रो इंडस्ट्रीज, लातूर यांनी वरील टँकरमध्ये एकूण २४.९३० टन सोयाबीन रिफाईन्ड तेल (किंमत रु. ३२,५१,१२१/-) भरून दिले. हे तेल मयुर कोकडवार यांच्या मयुर एजन्सी, जिंतूर येथे पोहचविण्यास सांगण्यात आले.रात्री ११.३० वाजता मयुर कोकडवार यांनी चालकाशी संपर्क साधला असता, त्याने टँकर सध्या रेणापूर पाटीजवळ असल्याचे सांगितले. मात्र, दिनांक १८/११/२०२४ रोजी सकाळी ७ वाजता चालकाने मयुर कोकडवार यांना फोन करून टँकरचा अपघात गंगाखेड-धर्मापुरी रस्त्यावर झाल्याचे सांगितले.मी तत्काळ घटनास्थळी (धर्मापुरी) पोहोचलो. मयुर कोकडवार हे देखील तेथे आले. पाहणी केली असता टँकर रस्त्याच्या कडेला कलंडलेला होता, टँकरवरील झाकणांचे सर्व नट काढून एकत्र ठेवलेले दिसले. जमिनीवर फक्त ५-६ फुटातच तेल पसरलेले होते. चालक सुस्थितीत होता. अपघाताची दिलेली माहिती आणि प्रत्यक्ष परिस्थिती यात तफावत होती. त्यानंतर चालक घटनास्थळावरून निघून गेला व पुन्हा तिथे परत आला नाही.आम्ही दुसऱ्या टँकरमध्ये शिल्लक राहिलेले तेल भरून वजन केले असता ते केवळ ४ टन ५२० किलो निघाले. त्यामुळे चालकाने २४.९३० टन तेलापैकी २०.४१० टन तेल परस्पर विक्री करून आर्थिक फसवणूक केल्याचा आम्हाला ठाम संशय आहे. अपघात हा बनावट असून त्याचा वापर करून माल लंपास करण्यात आला आहे.लातूर येथून जिंतूरला २४.९३० टन सोयाबीन रिफाइन्ड तेल घेऊन निघालेला टँकर (चक४६ इण २७१०) चालक राजेंद्र मुंडे याने गंगाखेड-धर्मापुरी रस्त्यावर अपघाताचा बनाव केला. तपासणीत फक्त ४.५२० टन तेल शिल्लक आढळले, त्यामुळे २०.४१० टन तेलाचा अपहार झाल्याचा संशय आहे. सदर प्रकरणी चालकाविरोधात » पान २ वर

# पोलीस दल जनतेच्या सेवेत

## धोरण:सिरसाळा पोलीस स्टेशनची तपासणी



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:पोलीस दल जनतेच्या सेवेत त्यांच्या रक्षणार्थ सदैव तत्पर असले पाहिजे असे बीड पोलीस अधिक्षक नवनित कॉवत यांनी सिरसाळा पोलीस स्टेशन येथे इन्स्पेक्शन ( तपासणी ) भेटी दरम्यान पोलीसांना मार्गदर्शन करतांना म्हटले आहे. काल दिनांक १२ रोजी सिरसाळा पोलीस स्टेशनचे इन्स्पेक्शन झाले , या वेळी अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले उपस्थित होते . इन्स्पेक्शन दरम्यान सुरक्षा वेवस्थेचा आढावा घेतला, परेड चे आयोजन करण्यात आले होते, परेड मध्ये सर्व पोलीस अधिकारी, कर्मचारी गणवेशात / वर्दीत शिस्त बद्ध उपस्थित होते . एसपींनी सर्वांची शिस्तेची तपासणी केली . दरम्यान पोलिसांना एसपी कॉवत यांनी महत्वाच्या सुचना करत मार्गदर्शन केले , या मुळे पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांत उत्साह निर्माण झाला , तसेच प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेतला आणी तात्काळ प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याच्या सुचना केल्या . कायदा व सुवेवस्था राखण्या संदर्भात व्यक्त झाले .

पोलीस दल जनतेच्या सेवेत सदैव तत्पर असले पाहिजे , प्रत्येक पोलीस अधिकारी आणी कर्मचारी यांनी आपली जबाबदारी तत्परतेने पार पाडावी असे ते म्हणाले, पोलीस अधिक्षक यांनी केलेल्या मार्गदर्शनाने पोलीसां मध्ये उत्साह निर्माण झाला आहे. सिरसाळा पोलिस स्टेशन चे प्रभारी गोरखनाथ दहिफळे , पोलीस उपनिरीक्षक आनंद जाधव सह सर्व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# मागासवर्गीय अधिकाऱ्याला धमकी

## अजय सरवदे:आमदारावर गुन्हा दाखल करा

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: विधानसभा क्षेत्राचे आमदार संदीप रवींद्र क्षीरसागर यांनी नगरपरिषद बीडमधील लेखापाल गणेश तुळशीराम पगारे यांना कारण नसताना चौरे नामक स्विय सहाय्यक यांच्या मोबाईलवरून अश्लील भाषेत शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली आहे. सदर घडलेला प्रकार हा गंभीर असून पगारे कुटुंबीय हे भयभीत झाले आहे आमदार संदीप क्षीरसागर हे त्यांच्या पदाचा गैरवापर करत गुन्हा दाखल करणे, कार्यकर्त्यांकडून मारहाण करणे किंवा कुटुंबावर हल्ला करणे अशा पद्धतीचे हातखंडे वापरून दबाव तंत्राचा वापर करतील अशी भीती लेखापाल गणेश तुळशीराम पगारे यांनी व्यक्त केली आहे. मा.पोलीस अधीक्षक बीड यांनी सदर प्रकरणी » पान २ वर

### टक्केवारी, ब्लॅकमेलिंग आता धमक्या!

बीड जिल्ह्यात धमकी ही नवी गोष्ट नव्हे या अगोदर आमदार संदीप क्षीरसागर यांनी आर .एम. शिंदे जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प. बीड या मागासवर्गीय अधिकाऱ्यांना खोटे काम करा अन्यथा विधानसभामध्ये तारांकित प्रश्न उपस्थित करतो अश्या आशयाचे धमक्या देवून नाहक त्रास दिला होता. नगरपरिषेचे लेखापाल गणेश पगारे यांना धमकी देऊन सिद्ध केले की आमदार मागासवर्गीय विरोधी असल्याचे दिसून येत आहे.

अजय सरवदे,जिल्हाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी बीड



# शहराच्या पाणी प्रश्नासाठी धावपळ

## आ.संदीप क्षीरसागर: पाणीपुरवठा कामाची पाहणी



पुण्यभूमी प्रतिनिधी


बीड:सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू असल्याने नागरिकांना पाण्यासाठी अडचण येऊ नये यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांची धावपळ सुरू आहे. शनिवार (दि.१२) रोजी भर उन्हात आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी म्हाळसजवळा येथे जाऊन सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना जलदगतीने काम पूर्ण करण्याच्या सूचना केल्या आहेत. काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे आणि शहरातील नागरिकांना वेळेत पाणी मिळावे यासाठी आमदार क्षीरसागर यांचा प्रयत्न सुरू आहे.

सध्या उन्हाच्या झळा अधिक तीव्र होऊ लागल्या आहेत. त्याचा परिणाम पाणी पुरवठ्यावर देखील होऊ लागला » पान २ वर

प्रा.मुंडे

## राजकीय:अधिकार मिळत नसल्याची खदखद

# महायुतीमधील मंत्र्यांमध्ये नाराजीनाट्य



पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर येऊन तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ झाला आहे. त्यानंतर मंत्र्यांमध्ये समन्वय नसल्याचा प्रकार समोर आला आहे. महायुतीमधील मंत्र्यांमध्ये नाराजीनाट्य सुरु आहे. राज्यातील राज्यमंत्री प्रचंड नाराज असल्याचे सांगितले जात आहे. त्याला कारण कॅबिनेट मंत्री आहेत. कॅबिनेट मंत्र्यांनी राज्यमंत्र्यांना अधिकाराचे वाटप केले नाही. त्यामुळेच आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर आरोग्य सन्मान पुरस्काराच्या कार्यक्रमात अनुपस्थित राहिल्या. या घटनेनंतर अनेक राज्यमंत्र्यांनी खासगीत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. आता सर्व राज्यमंत्री एकत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे सांगितले जात आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ ५ डिसेंबर २०२४ रोजी घेतली. त्यानंतर दीर्घ कालावधीनंतर मंत्र्यांचा शपथविधी झाला. मग खातेवाटप रेंगाळले होते. त्यानंतर पालकमंत्री पदाची जबाबदारी लवकर दिली गेली नाही. जबाबदारी दिल्यानंतर नाशिक, रायगडच्या पालकमंत्रीपदवरुन वाद सुरु झाला. हा वाट अजूनही मिटलेला नाही. तसेच धाराशिवमध्येही पालकमंत्रीपदावरुन भाजप व शिवसेनेत वाद सुरु झाला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना पालकमंत्रीपदावरुन हटवण्याची मागणी भाजप करत आहे. आता कॅबिनेट आणि राज्यमंत्री यांच्यातील वाद समोर आला आहे.

### फडणवीस यांचा आदर्श इतरांनी घेतला नाही

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःकडे गृहखाते ठेवले आहे. त्यांनी गृह मंत्रालयाच्या अधिकाराचे वाटप करत काही अधिकार राज्यमंत्री योगेश कदम यांना दिले आहेत. यामुळे शिवसेना गटातून मंत्री झालेले योगेश कदम अनेक प्रकरणात थेटपणे भूमिका मांडत आहेत. परंतु मुख्यमंत्र्यांप्रमाणे अधिकार इतर कॅबिनेट मंत्र्यांनी राज्यमंत्र्यांना दिले नाही. यामुळे राज्यमंत्री नाराज आहेत. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच या प्रकरणात लक्ष द्यावे, या मागणीसाठी सर्व राज्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे.

# डाके पिंप्रीत अवैध वाळू उपसा

## दणका:विक्रीवर सिरसाळा पोलीसांची कारवाई



पुण्यभूमी प्रतिनिधी

सिरसाळा: माजलगाव तालुक्यातील डाके पिंप्री येथील गोदावरी पात्रातून अवैध वाळू उपसा करुन त्याची विक्री होत असतांना सिरसाळा पोलीसांनी कार्यवाही केली आहे . या कार्यवाहीत तीन वाहने ताब्यात घेतली असुन वाहन, वाळू असा साडेचार लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे . हि कार्यवाही दिनांक ९/१० रोजी रात्री सह पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे व त्यांची टीम यांनी केली आहे. या वियषी सविस्तर वृत्त असे कि,त्या दिवशी रात्री ११ वाजण्याचे सुमारास पोलीस ठाणे सिरसाळा येथे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली » पान २ वर

## रेल्वेची भूमिका निर्णायक

महाराष्ट्रामध्ये इतिहासप्रेमी नागरिकांची संख्या आजही लाखोंच्या घरामध्ये आहे. ऐतिहासिक गड–किल्ले, राजवाडे, स्मृतिस्थळे, नदी, सागर, तलाव, ऐतिहासिक लढायांची ठिकाणे, राजवाडे हे सर्व पाहण्यासाठी, तेथील इतिहासकालीन घडामोडींचा आढावा घेण्यासाठी इतिहासप्रेमींची कायम तगमग असते. धकाधकीच्या काळामध्ये पर्यटनाच्या माध्यमातून वेळ मिळेल तेव्हा इतिहासप्रेमी आपली 'तलफ' भागविण्यासाठी एसटी, रेल्वे तसेच खासगी वाहनांच्या माध्यमातून त्या ठिकाणी जाऊन इतिहासाचा मागोवा घेत असतात. यासाठी त्यांना प्रवासासाठी प्रचंड त्रासाचा सामना करावा लागतो, दगदग सहन करावी लागते. इतिहासप्रेमींची ही तगमग लक्षात घेऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सत्तेवर येताच त्यांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी त्यांनी केंद्र सरकारकडेदेखील पाठपुरावा केला आहे. त्या प्रयत्नांची, पाठपुराव्याची दखल केंद्र सरकारने घेतली असून त्यांच्या परिश्रमाला केंद्राकडूनही कृतीतून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. काँग्रेसची केंद्रात व राज्यात एकहाती सत्ता असतानाही इतिहासप्रेमींसाठी काही केले नाही, पण भाजपाने 'करून दाखवले', त्याचीच परिणती म्हणून लवकरच केंद्र सरकारच्या रेल्वे विभागाच्या माध्यमातून लवकरच महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन सुरू होणार आहे. महाराष्ट्राच्या विकासामध्ये आता रेल्वेची भूमिका निर्णायक राहणार असून त्यादृष्टीने रेल्वेने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. महाराष्ट्रात १ लाख ७३ हजार कोटींची कामे सुरू आहेत. यात मुंबईसह इतर परिसरात १७ हजार कोटींची कामे सुरू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासोबत घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेमुळे महाराष्ट्राबाबत रेल्वेचे सुरू असलेले प्रकल्प, विकासाच्या योजना याबाबत माहिती मिळाल्याने महाराष्ट्रामध्ये रेल्वे राबवत असलेल्या प्रकल्पाची महाराष्ट्रीय जनतेला माहिती झाली. मुंबईतील अनेक रेल्वे प्रकल्पांची कामं प्रगतिपथावर आहेत. राज्यातील १३२ रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास करण्यात येणार आहे. महाराष्ट्रासाठी १ लाख ७३ हजार कोटींचे रेल्वे प्रकल्प उभारले जाणार आहेत. यावर्षी जवळपास २४ हजार कोटी राज्याला मिळाले आहेत. राज्यात छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन सुरू करणार आहे. या सर्किट ट्रेनने राज्यातील ऐतिहासिक स्थळांना भेट देता येणार आहे. सर्किट ट्रेनने १० दिवस प्रवास करता येणार आहे. विदर्भाचा छत्तीसगड–तेलंगणासोबतचा व्यवहार वाढणार आहे. गोंदिया बल्लारशा रेल्वे लाईनचा दुहेरीकरण याकरिता ४८१९ कोटी रुपये हे केंद्र सरकारने या ठिकाणी दिलेले आहेत आणि यामुळे निश्चितपणे जो विदर्भाचा भाग आहे, त्याला एक मोठा फायदा होणार आहे. विशेषत: छत्तीसगड आणि तेलंगणाचा जो व्यापार आणि व्यवहार आहे हा विदर्भाचा विकास होण्यासाठी, कायापालट होण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. गोंदिया अशा ठिकाणी आहे की, जिथे मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या दोघांची बॉर्डर आहे आणि पलीकडे बल्लारशापासून तेलंगणा आणि तिकडे आंध्र प्रदेश आपल्याला मिळतो. त्यामुळे अतिशय स्ट्रॅटेजीक अशा प्रकारची ही जी लाईन आहे. महाराष्ट्रातील १३२ रेल्वे स्थानकांचा केंद्र सरकारकडून विकास केला जाणार आहे. या रेल्वे स्थानकांचा विकास रेल्वे मंत्रालय करणार आहे. त्यामध्ये मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचाही समावेश आहे.

महाराष्ट्राच्या विकासाला केंद्राकडून नेहमीच झुकते माप दिले जाणार असल्याची घोषणा पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा सातत्याने भाषणातून, विविध कार्यक्रमातून करत असतात. त्या घोषणा या केवळ घोषणा न राहता, त्या प्रत्यक्षात साकारल्या जात असल्याचे नेहमीच कृतीतूनही पाहावयास मिळत आहे. रेल्वेच्या अर्थसंकल्पामध्ये १ लाख ७३ हजार कोटी रुपये महाराष्ट्राला मिळालेले आहेत. २०१४ पूर्वीचा मागोवा घेतल्यास यूपीए सरकारच्या काळात त्यांनी महाराष्ट्राला दहा वर्षांत दहा हजार कोटी रुपये देखील एकत्रितपणे दिलेले नाहीत. छत्रपती शिवाजी महाराज सर्किट हा प्रकल्प महाराष्ट्रातील इतिहासप्रेमींच्या पर्यटनाला चालना देणारा प्रकल्प ठरणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची ऐतिहासिक स्थळे आणि राज्यातील इतर सांस्कृतिक स्थळे पाहता यावीत याकरिता केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने नवी योजना आणली आहे. त्यानुसार, छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन सुरू करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन सुरू होणार आहे. ज्यामध्ये सुंदर अशा प्रकारची आयकॉनिक रेल्वे सुरू होईल. यामार्फत दहा दिवसांची टूर केली जाईल. छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले, जागा, त्यांच्याशी संबंधित इतर सांस्कृतिक स्थळांना ही रेल्वे जोडणार आहे. गोंदिया–बल्लारशा रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाकरिता ४ हजार ८१९ कोटी रुपये केंद्र सरकारने दिले आहेत. यामुळे निश्चितपणे विदर्भाला मोठा फायदा होणार आहे. छत्तीसगड आणि तेलंगणासाठी व्यापार, व्यवहार वाढण्याच्या दृष्टीने ही महत्त्वाची रेल्वे लाईन आहे. गोंदियातून मध्य प्रदेश आणि छत्तीसगडची सीमा आहे. त्यामुळे स्ट्रॅटेजिक लाईन मंजूर झाल्याचे खरे श्रेय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आहे. १ लाख ७३ हजार कोटी रुपये केंद्र सरकार रेल्वे इन्फ्रावर खर्च करत आहे. महाराष्ट्रातील सर्व महत्त्वाच्या स्थानकांचे वर्ड क्लास ट्रान्स्फर्मेशन होत आहे. शिवरायांच्या इतिहासाचे दर्शन घडवणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन ही १० दिवसांची रेल्वे टूर असणार आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून आता लवकरच सुरू होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज सर्किटच्या माध्यमातून ज्यामध्ये अतिशय सुंदर अशा प्रकारची आयकॉनिक रेल्वे दहा दिवसांचा टूर हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जी काही विविध महत्त्वाचे किल्ले आहेत किंवा जागा आहेत आणि अर्थातच त्यांच्याशी संबंधित इतर सांस्कृतिक स्थळ आहेत, याला जोडणारी सुरुवात ही रेल्वे विभाग त्या ठिकाणी करत आहे.

# समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले



सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांची आज १९८ वी जयंती. त्यानिमित्ताने त्यांच्या सामाजिक कार्याची ओळख करुन देणारा लेख.महात्मा ज्योतिबा फुले यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण. त्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला, त्यांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. ज्योतिबा फुले केवळ नऊ महिन्यांचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले.ज्योतिबांचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी सावित्रीबाई फुले यांच्याशी झाला. प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. इ.स. १८४२ मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. बुद्धी अतिशय तल्लख, त्यामुळे पाच–सहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला. शिक्षणात हुशार असलेल्या ज्योतिबाने शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. पुण्यातील बुधवार पेठेत भिडे वाडा येथे १ जानेवारी १८४८ रोजी फुले दांपत्यांनी मुलींची शाळा सुरू केली होती. महात्मा फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले ते या ओळीतून.या अजूनही तंतोतंत लागू पडतात.

विद्येविना मती गेली ।मतीविना नीती गेली ।
नीतीविना गती गेली ।गतीविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

२४ सप्टेंबर इ.स. १८७३ रोजी महात्मा जोतिराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सत्यशोधक समाज सोसायटीचे ते पहिले अध्यक्ष आणि खजिनदार होते. वेदांना झुगारून त्यांनी हे कार्य करण्यास सुरुवात केली. त्यांनी जातीय भेद आणि चातुर्वर्णीय भेदभावास विरोध करण्यास सुरुवात केली आणि त्यामुळेच कदाचित महात्मा फुले यांचे कार्य समित ठेवले गेले असावे.अन्यथा आशिया खंडात आणि इंग्रजांना न घाबरणारा ज्योतिबा शिक्षणाचं बीजं रोवणारा वाघ होता.तो तर गुरगुरणारच.अस्पृश्यांसाठी लढणारा पहिला समाजसुधारक म्हणणे यथोचित होईल.

महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.या सत्यशोधक समाजाचे स्त्री विभागाचे नेतृत्व सावित्रीबाई यांनी केले. काय दूरदृष्टी असावी! विविध संघटना पक्षाच्या महिला आघाड्या ह्या आज महिला सांभाळतायत.पण,ज्या काळात महिलांना वर मान करून बघण्याची मुभा नव्हती त्याकाळी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या महिला विभागाचे नेतृत्व देणं म्हणजे स्त्रीपुरूष समानतेच पहिलं पाऊल.तसेच, सावित्रीबाई फुले यांच्याबरोबर १९ स्त्रियांनी सत्यशोधक समाजाचे कार्य करीत होत्या. त्याचवेळी सावित्रीबाई ह्या एका कन्याशाळेच्या शिक्षिकाही होत्या. दीनबंधू प्रकाशनाने सत्यशोधक चळवळीच्यावेळी लेखन–प्रकाशनचे काम केले. महाराष्ट्रातील तळागाळापर्यंत चळवळ पोचली. छत्रपती शाहू महाराजांनी सत्यशोधक चळवळीस पाठिंबा दिला. न्यायापासून, अत्याचारांपासून व गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना हक्काची जाणीव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सर्वसाक्षी जगत्पती । त्याला नकोच मध्यस्ती ।। हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली.त्यांचे काम महाराष्ट्रापुरते मर्यादित राहिले ही सर्वात मोठी चूक.

सामाजिक प्रबोधन, अस्पृश्यता व जातिव्यवस्थेचे



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

निर्मूलन, आणि स्त्रियांना व मागास जातीच्या लोकांना शिक्षण देण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केले.त्यामुळे महात्मा फुले आणि त्यांच्या पत्नी भारतातील पहिली महिला शिक्षिका सावित्रीबाई फ ुले हे दोघे भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते आहेत. कारण,जोतिरावांनी १८४८ मध्ये पुण्यात तात्यासाहेब भिडे यांच्या भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. खालच्या आणि अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींमधील लोकांना समान हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी आपल्या अनुयायांसह सत्यशोधक समाजाची स्थापना केली. महात्मा ज्योतिबा फुले हे आशिया खंडातील पहिले शिक्षणतज्ज्ञ ठरताता मात्र त्यांना महाराष्ट्रापुरते सिमीत ठेवण्याचे काम इथल्या उच्चवर्णीयांनी केले. तत्कालीन समाजातील जातिभेद अनिष्ट प्रथा, तसेच समाजातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी याविरुद्ध महात्मा फुले सतत संघर्षरत होते आणि ते त्यांच्या साहित्यातून उमटत . त्याकाळच्या समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखविण्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे आजच्या आणि येणाऱ्या तमाम पिढ्यांना मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरतायत. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीमध्ये महात्मा फुले यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्याच समताधिष्ठित समाजाची पेरणी डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात केली. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या समताधिष्ठित समाजाची कल्पना अजूनही कल्पनाच म्हणावी लागेल.सर्वच क्षेत्रात आज विषमता दिसते. त्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले समजून घेणे आवश्यक आहे.महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजाची चळवळ पुन्हा उभी टाकणं आवश्यक आहे. शिक्षण महाग करून, पुन्हा कालचे अस्पृश्य आणि आजचे बौद्ध यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याच धोरण राज्यकर्ते राबवताहेत. गरिबीत खितपत आणि आरक्षण नावाला ठेवून सर्व क्षेत्रात खासगीकरण करून आरक्षणापासून वंचित ठेवलं जात आहे.बहुजन समाजाला शिक्षणापासून दूर ठेवण्यासाठी शिक्षण महाग केलं आहे. शिष्यवृत्ती शिकत असताना वेळेवर येत नाही.नंतर त्या शिष्यवृत्तीचा काय लोणचं करायचं का? म्हणजे शिकूच नये अशी तजवीज? त्यामुळे सर्वसामान्य बहुजन समाजाने सत्याचा शोध घेतला पाहिजे. अन्यथा दिवसेंदिवस आर्थिक विषमता वाढत जाईल.

# फार्मसी महाविद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी

अंबाजोगाई/प्रतिनिधी

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळा अंतर्गत असलेल्या (औषध निर्माण) बी. फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि ११ रोजी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि आदराने साजरी करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित या जयंती उत्सवाच्या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महात्मा फुले यांच्या समाज सुधारणेच्या कार्याला उजाळा देत, त्यांच्या विचारांचा आजच्या पिढीला प्रेरणा म्हणून स्वीकार करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करत महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा.मामून खुरेशी यांनी उपस्थितांना संबोधित करताना महात्मा फुले यांच्या स्त्री शिक्षण, समता आणि सामाजिक न्यायाच्या कार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले महात्मा फुले यांनी समाजातील दडपशाही आणि अंधश्रद्धेविरुद्ध लढा देत शिक्षणाचा पाया रचला.

त्यांचे विचार आजही आपल्याला प्रेरणा देत असल्याचे प्रा मामुन कुरेशी यांनी सांगितले. यावेळी फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या भावना व्यक्त करतांना त्यांनी महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या प्रचार प्रसार व योगदानाबद्ध माहिती सांगितली. पुढे ते म्हणाले की महात्मा फुले यांनी समाजातील प्रत्येक वर्गाला शिक्षणाचा हक्क मिळावा यासाठी आपले आयुष्य वेचले. आजच्या तरुणांनी त्यांचा हा वारसा पुढे न्यावा असे आवाहन प्राचार्य तरके यांनी उपस्थित



विद्यार्थ्यांना केले. त्याचबरोबर त्यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक भान जपण्याचे आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजसेवा करण्याचा सल्ला देखील दिला.

कार्यक्रमात प्राध्यापक वर्गातील डॉ. रिझवान पठाण, डॉ. गीतांजली चव्हाण, प्रा. काव्या रेड्डी, प्रा. मंजुषा करेप्पा, प्रा. इम्रान सय्यद, प्रा. अश्विनी घोलकर, प्रा. अमर कावरे, डॉ. गणेश गिरी आणि प्रा. साखरे विशाल यांनी विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनीही महात्मा फुले यांच्या कार्यावर आधारित भाषणे, कविता आणि सांस्कृतिक सादरीकरण केले. विशेषत: एन एस एस या विभागाच्या विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेने सर्वांचे लक्ष वेधले. या कार्यक्रमाच्या आयोजन व यशस्वीतेसाठी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे विद्यार्थी ,प्राध्यापक, त्याचबरोबर शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी देखील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी महात्मा फुले यांच्या विचारांना आत्मसात करून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा संकल्प केला. हा जयंती समारोह विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव जागवणारा आणि क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करणारा असाच ठरला.

## पान एक वरून

**मागासवर्गीय अधिकाऱ्याला**

आपण व्यक्तिशः लक्ष देऊन चौरे नामक पीए व संदीप क्षीरसागर यांच्या मोबाईल वरून झालेल्या संभाषणाचा वेळ, सीडीआर, कॉल डिटेल्स तपासून संबंधित आमदारावर गुन्हा दाखल करण्यात यावा व पगारे कुटुंबीयांना पोलीस संरक्षण द्यावे अशी मागणी वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने केली आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम वीर, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर प्रेम कांबळे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

**शहराच्या पाणी प्रश्नासाठी**

आहे. शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या योजनेचे काम म्हाळसजवळा परिसरात सुरू आहे. शनिवारी दुपारी भर उन्हात आ. संदीप क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद सलीम यांनी म्हाळसजवळा येथे भेट देऊन कामाची पाहणी केली. यावेळी आ. संदीप क्षीरसागर यांनी बीड शहरातील पाणी पुरवठ्याच्या अनुषंगाने संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना योग्य त्या सुचना केल्या आहेत तसेच काम अधिक गतीने पूर्ण करण्याचेही निर्देश दिले आहेत.

**अपघाताचा बनाव करून केला**

फसवणुकीची पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे.सदिल फिर्याद संजय ज्ञानोबा फुके यांच्या सांगण्यावरून घेण्यात आली. सदरील प्रकरणाचा तपास ग्रामीण पोलीसस्टेशनचे पोलिस निरीक्षक मझहरअली यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अनमोल हे करत आहेत

**डाके पिंप्रीत अवैध वाळू**

की, डाके पिंप्री येथे गोदावरी नदीच्या काठावर ४०७ टॅम्पोने वाळूची अवैध चोरटी वाहतुक होते आहे. अशी खात्रीशिर माहीती मिळाली, बातमी समजताच सपोनि दहिफळे व त्यांचे सहकारी राठोड, गुट्टे अशी टीम पोलीस ठाणे सिरसाळा येथुन डाकेपिंप्री येथे जावुन दोन पंचाना बोलावुन घेवुन बातमीचा आशय सांगुन गोदावरी नदीच्या काठावर जावुन पाहीले असता प्रकार दिसुन आला, दरम्यान रेड पार्टीस पाहून टॅम्पोचे ड्रायव्हर पळून गेले.

तेथे टॅम्पो जवळ जावुन पाहीले असता तेथे तीन ४०७ टॅम्पो, मिळुन आले त्यांची पाहणी केली असता त्यामध्ये अंदाजे एक– एक ब्रास वाळु मिळुन आली. विना क्रमांक वाहन, वाळू सर्व मिळून ४ लाख ६८ हजारांचा ऐवज जप्त करत ताब्यात घेतला आहे . या कार्यवाहीने अवैध वाळू तस्करी करणाऱ्या माफियांचे धाबे दणाणले आहेत.

## पान सहा वरून

**बीडच्या जिल्हा क्रीडांगणाच्या स्विमिंग**

प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे झालेल्या एका तरुण मुलाच्या मृत्यू जबाबदार असलेल्या सर्व लोकांवर गुन्हा नोंद करण्याची मागणी करण्यात येत आहे. रात्री उशिरापर्यंत संतोष कांबळे यांचे शवविच्छेदन करण्यात आले नव्हते गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत शव–विच्छेदन करणार नसल्याची भूमिका नातेवाईकांनी घेतली आहे.

**साबला येथे जयंती**

यांच्या कार्यावर पहिला पोवाडा कुळवाडी कुळभुषण या नावाने लिहिला .क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती साजरी करत असताना उपस्थित मान्यवर माजी सरपंच महादेव कटारे , रंगनाथ काकडे , माजी पोलिस उपनिरिक्षक उमाशंकर शिंदे , माजी उपसरपंच दादा नाईकनवरे , ग्रामपंचायत उपसरपंच पवन सरवदे , सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ , पोपट काकडे , से . स . सो . संचालक सदाशिव काकडे , माजी ग्रामपंचायत सदस्य रामराजे शिंदे , शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शंकर नाईकनवरे जि . प . प्रा . शाळा साबला . तसेच राजेभाऊ काकडे , मुरली रोकडे , जालींदर मुळे , लक्ष्मण काकडे , अनंत नाईकनवरे , गणेश कटारे , गुलाब मुळे , बंडू परळकर , हनुमंत मुळे , वसंत नाईकनवरे , विठ्ठल काकडे , सावता नाईकनवरे , शिवाजी काकडे , पिंटू काकडे , बाळासाहेब काकडे , भागवत नाईकनवरे , गौतम घाडगे , बाबासाहेब काकडे इत्यादींच्या उपस्थितीत क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली .

**अखेर अमरण उपोषण**

लघु पाटबंधारे विभाग अभियंता यांच्याकडून सर्व मागण्याचे लेखी आश्वासन घेऊन तीन महिन्यात मागण्या पूर्ण करण्यात येतील या अटीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछीरे लोणार शहर प्रमुख गजानन जाधव सर युवा शहर प्रमुख श्रीकांत मादनकर यांच्या हस्ते लिंबूपाणी घेऊन उपोषण सोडण्यात आले.

**कळंबमध्ये येडेश्वरी यात्रेला**

दिवशी येडेश्वरी मंदिर परिसरात व चुना वेचण्याच्या परिसरात आणी आमराई परिसरात प्रचंड गर्दी दिसून येत आहे तसेच या यात्रेसाठी मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी येत असतात त्या अनुषंगाने दोन दिवस देविची पालखी व इतर धार्मिक कार्यक्रम असल्याने या दिवशी यात्रेत काही अनुचित प्रकार घडू नये व शांतता रहावि या अनुषंगाने महाराष्ट्र दारु बंदी कायदा १९४९ चे कलम १४२ (१) अन्वये श्री.येडेश्वरी मंदिर परिसरातील व येरमाळा गावातील सर्व किरकोळ देशीसह विदेशी मद्य विक्री बंद करण्याचे जिल्हाधिकारी मा.पुजार यांनी आदेश दिले आहेत या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या त्याच्या विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्यातील नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल असे जिल्हाधिकारी पुजार यांनी माहिती दिली आहे.

**२१० जणांची मोफत आरोग्य**

डॉ. विनोद राहिंज,डॉ. प्रगती राख, डॉ. मोहिते, डॉ. नागरे, डॉ. शिंदे, डॉ. अमोल मार्कंड, रामेश्वर ढोबळे, रुग्णालय इन्चार्ज शशिकांत काळे यांची उपस्थिती होती. यावेळी अंबाजोगाईतील प्रसिद्ध नेत्रविकार तज्ज्ञ डॉ. कोमल शर्मा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, आदित्य शिक्षण संस्थेने गोरगरीब लोकांसाठी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू तपासणी शिबिराचे आयोजन खूप छान प्रकारे केले. त्याबद्दल कौतुक व्यक्त केले. त्यांना निमंत्रित केल्याबद्दल आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका आदिती सारडा आणि संस्थेचे त्यांनी आभार मानले. त्या म्हणाल्या आदित्य हॉस्पिटल मध्ये सर्व अत्याधुनिक उपकरणे असल्यामुळे तपासणी करणे सोपे झाले. याचा रुग्णांना मोठा फायदा होत आहे. डॉ. विवेक कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना जागतिक आरोग्य दिनानिमित्त आरोग्य कसे सुधारावे याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन –डॉ. प्रगती राख यांनी केले. आभार शशिकांत काळे यांनी मानले.

**जयभीम महोत्सवात चित्रकला**

नानाभाऊ हजारे, अधिकक्षक शालेय पोषण आहार तुकाराम पवार, शिक्षण विस्तार अधिकारी भगवान सोनवणे, सूर्यकांत जोगदंड, अनिल डोंगरे, लक्ष्मीकांत अवढाळ, राजेंद्र खेडकर आदी उपस्थित होते. या भव्य चित्रकला स्पर्धेचे प्रास्तविक विजयकुमार समुद्रे, सूत्रसंचालन सुमेध जोगदंड,सुनिल डोंगरे, प्रा.अशोक गायकवाड यांनी मानले. दरम्यान जयभीम महोत्सवात आयोजित कार्यक्रमांस जनतेने उपस्थित रहावे. असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

**माथेफिरुने लावली**

ठिबक जाळण्यात आले. व शेतकऱ्याचे ५० हजाराचे नुकसान झाले.तरी अशा माथेफिरूचा शोध घेऊन संमंधीत प्रशासनाने कडक कारवाई केली पाहिजे असे शिरसाट यांचे मत आहे.असे अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाने अशा माथेफिरूवर दंडात्मक कारवाई केली पाहिजे कारण यापुढे असे अनुचित प्रकार घडणार नाही शेतकऱ्यांचे नुकसान होनार यांची काळजी प्रशासनाने घेतली पाहिजे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## आंबेडकर ज्ञान केंद्रात चोख व्यवस्था ठेवण्याचे निर्देश

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील ५/ड प्रभागानजीक उभारण्यात आलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञान केंद्राचा लोकार्पण सोहळा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनाच्या पूर्व संध्येला म्हणजे दि.१३ एप्रिल रोजी सायंकाळी मान्यवरांच्या हस्ते संपन्न होत आहे. या लोकार्पण सोहळ्याच्या पूर्व तयारीच्या कामांची आढावा बैठक महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या दालनात शुक्रवारी संपन्न झाली, त्यावेळी आयुक्तांनी कार्यक्रम स्थळी सुरु असलेल्या आणि झालेल्या तयारीची माहिती उपस्थित अधिकारी वर्गाकडून घेतली. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त-१ हर्षल गायकवाड, अतिरिक्त आयुक्त-२ योगेश गोडसे, इतर संबंधित अधिकारी वर्ग, पोलीस अधिकारी, जयंती उत्सव समितीचे सुमेध हुमणे उपस्थित होते. ज्ञान केंद्र परिसर, लोकार्पणानंतर दि. १४ तारखेला देखील सकाळ पासून खुले राहणार असल्याने, सदर ठिकाणी होणाऱ्या गर्दीचे पोलीसांच्या मदतीने नीट नियोजन करावे, ज्ञान केंद्राच्या मार्गावर दिशा दर्शक फलक लावावा. ज्ञान केंद्राचे काम पूर्ण झाले आहे याची शहानिशा करावी. दि. १३ एप्रिल रोजी सायंकाळ पासून कार्यक्रम स्थळी रुग्णवाहिका व वैद्यकीय पथक तैनात ठेवावे. जनरेटर व विद्युत व्यवस्था चोख ठेवावी. अग्निशमन दलाने देखील आपल्या गाड्या पूर्व तयारीनिशी सज्ज ठेवाव्यात, अशा सूचना आयुक्तांनी यावेळी बैठकीत उपस्थित असलेल्या संबंधित अधिकारी वर्गास दिल्या.

## वेचक

### महात्मा जोतिबा फुले यांची जयंती उत्साहात



**अंबरनाथ :** थोर समाजसेवक, क्रांतीकारक महात्मा जोतिबा फुले यांची जयंती अंबरनाथ नगरपरिषदेमध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. फुले यांचा ११ एप्रिल १८२७ रोजी त्यांचा जन्म झाला. ज्योतिबा फुलेंनी सामाजिक प्रबोधन, अस्पृश्यता व जातिव्यवस्थेचे निर्मूलन, आणि स्त्रियांना व मागास जातीच्या लोकांना शिक्षण देण्याचे कार्य केले. अंबरनाथ नगरपरिषदमध्ये मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरा करण्यात आली. सदर कार्यक्रमास उपमुख्याधिकारी उमेश राऊत तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### हनुमान जन्मोत्सव सोहळ्यात बुकेऐवजी बुक

**ठाणे :** ठाणे पुर्वेकडील कोपरीतील श्री पवनसुत सेवा प्रतिष्ठानने वाचन चळवळीची जपणूक व्हावी या हेतुने हनुमान जन्मोत्सवानिमित्त अतिथी भाविकांना बुके (पुष्पगुच्छ) ऐवजी बुक (पुस्तक) प्रदान करण्याचा वसा यावर्षीही जपण्याचे ठरवले आहे. ठाणे,पूर्व कोपरीतील साईनाथ नगर येथील श्री पवनसुत हनुमान मंदिरात शनिवारी हनुमान जन्मोत्सव साजरा होणार आहे. यानिमित्त दुपारी सत्यनारायणाच्या महापूजेनिमित्त हजारो गोरगरिबांना अन्नदान करण्यात येणार आहे. श्री पवनसुत सेवा प्रतिष्ठानच्यावतीने गेली ४६ वर्षे हा उपक्रम राबविण्यात येत आहे. शनिवारी पहाटे हनुमान जन्मोत्सवाची विधीवत पूजाअर्चा, सकाळी साग्रसंगीत सुंदरकांड पाठ, दुपारी समाजसेवक हेमंत पमनानी यांच्या विद्यमाने महाप्रसाद (भंडारा) तर,सायंकाळी सुश्राव्य भजन-कीर्तन आणि महिलावर्गासाठी हळदी-कुंकूचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, गतवर्षी प्रमाणे यंदादेखील हनुमान जन्मोत्सवा निमित्त वाचन चळवळीची जपणूक केली आहे. हनुमान मंदिरात येणाऱ्या अतिथी भाविकांना यंदा पुष्पगुच्छ (बुके) न देता वाचनीय पुस्तक (बुक) भेट देण्यात येणार आहे. या वाचन चळवळीला बळ मिळावे यासाठी शारदा प्रकाशनचे प्रा. संतोष राणे यांनी विशेष पुढाकार घेतला आहे.

### मुरबाडमध्ये भव्य-दिव्य भीम महोत्सवाचे आयोजन

**मुरबाड :** भारतीय संविधानाचे निर्माते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधून मुरबाड या बाबासाहेबांच्या आजोळी १२ ते १४ एप्रिल असं सलग तीन दिवस भव्यदिव्य भीम महोत्सवाचे आयोजन सिद्धार्थ युवक मित्र मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर यांनी केले आहे. या भीम महोत्सवात अनेक उपक्रम राबविण्यात येणार असून या भीम उत्सवाला मुरबाड तालुक्यातील तमाम जनतेने उपस्थित राहण्याचे आवाहन सिद्धार्थ युवक मित्र मंडळाचे अध्यक्ष तथा आरपीआय आठवले पक्षाचे शहर शहराध्यक्ष कैलास देसले व मुरबाड नगरपंचायती माजी नगरसेवक तथा स्वच्छता आरोग्य सभापती रवींद्र देसले यांनी केली आहे. लोकनेते भाऊसाहेब देसले संस्थापक अध्यक्ष असलेल्या सिद्धार्थ युवक मित्र मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, मुरबाडचे यंदाचे सलग ४७ वर्ष असून २०२५ चा भीमजयंतीचा कार्यक्रम भीम महोत्सव म्हणून साजरा करीत आहेत. या भीम महोत्सवाला भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे, आमदार किसन कथोरे, माजी आमदार गोटीरामभाऊ पवार, सिडकोचे माजी अध्यक्ष प्रमोद हिंदुराव, यांच्यासह आंबेडकर चळवळीतील नामवंत मान्यवर, आरपीआय आठवले पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी ,मित्र पक्ष सर्वच राजकीय पक्षाचे सर्व मंडळी उपस्थित राहणार आहेत.

# हरित आच्छादने आणि तात्पुरत्या पाणपोयींची सुविधा वाढवण्याचे निर्देश

### आयुक्त सौरभ राव यांची पावसाळा पूर्वतयारीबाबत सूचना

◆ ठाणे(प्रतिनिधी):



उन्हापासून बचाव होण्यासाठी मोठ्या सिग्नलपाशी लावण्यात आलेली हरित आच्छादने आणि तात्पुरत्या पाणपोई यांच्याबद्दल नागरिकांनी ठाणे महापालिकेस सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे,आवश्यकतेनुसार या दोन्ही सुविधांची संख्या वाढवण्याचे निर्देश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पर्यावरण विभाग यांना दिले आहेत.

ठाणे महापालिका क्षेत्रासाठी उष्णता कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार, गतवर्षीपासून महापालिकेतर्फे स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने तात्पुरत्या पाणपोई सुरू करण्यात येतात. यंदाही अशा २५ पाणपोई सुरू करण्यात आल्या आहेत. त्याला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद असून त्यांची संख्या वाढवण्याची गरज आहे. त्यामुळे, स्वयंसेवी संस्था आणि लोकसहभागातून ही संख्या वाढवण्यात यावी, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत.

तसेच, तीन हात नाका (२), अल्मेडा चौक (०१) खोपट (२), नितीन कंपनी (१) या सहा ठिकाणी वाहनचालकांना उन्हापासून काहीसा दिलासा मिळावा यासाठी हरित आच्छादनांची व्यवस्था महापालिकेमार्फत करण्यात आली आहे. आता ठाणे महापालिका क्षेत्रात जिथे ६० सेकंदांपेक्षा जास्त वेळेचा सिग्नल आहे, अशा ठिकाणी हरित आच्छादनांची व्यवस्था करावी, असेही निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत.

राज्य शासनाच्या १०० दिवस कार्यक्रमाची प्रगती, उष्णतेच्या लाटेबाबतच्या उपाययोजना, स्वच्छ सर्वेक्षण, इ-ऑफिस कार्यप्रणालीची अमलबजावणी आदी विषयांचा आढावा महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी गुरूवारी महापालिका मुख्यालय येथे झालेल्या विभाग प्रमुखांच्या आढावा बैठकीत घेतला. अरविंद पेंडसे सभागृह येथे झालेल्या या बैठकीस अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, नगररचना सहाय्यक संचालक संग्राम कानडे, उपायुक्त मनीष जोशी, उमेश बिरारी, जी. जी. गोदेपुरे, दिनेश तायडे, शंकर पाटोळे, सचिन सांगळे, मधुकर बोडके, अनघा कदम, पद्मश्री बैनाडे यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

पावसाळ्याच्या पूर्व तयारीच्या दृष्टीने होत असलेली झाडांच्या धोकादायक फांद्यांची छाटणी, नालेसफाईच्या कामांची निविदा प्रक्रिया, तसेच खड्डेमुक्त ठाणे मोहिमेच्या प्रगतीचा आढावा या बैठकीत आयुक्त राव यांनी घेतला. वारंवार खड्डे पडणाऱ्या ठिकाणांची आधीच पाहणी करून तेथे प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. त्यासाठी काही नाविन्यपूर्ण तोडगे काढता आले तर पहावे. जेणेकरून नागरिकांना खड्ड्यांचा सामना करावा लागणार नाही.

तसेच, रस्ता नादुरुस्त असल्याची तक्रार आल्यापासून २४ तासांच्या आत ती तक्रार मार्गी लागेल यासाठी गेल्यावर्षीप्रमाणेच सर्व यंत्रणांना समन्वय ठेवावा, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

### भूमी अभिलेख विभागातर्फे डोंबिवली येथे आयोजन

# वारस हक्क नोंदसाठी फेरफार अदालत

◆ कल्याण (प्रतिनिधी) :

कल्याण, डोंबिवली परिसरातील नागरिकांच्या नगर भूमापन विभागातील तक्रारींचे निराकरण आणि फेरफार नोंदीसाठी उप अधीक्षक, भूमि अभिलेख, कल्याण विभागातर्फे येत्या बुधवार,१६ एप्रिल रोजी डोंबिवली येथे फेरफार अदालतचे सकाळी १० ते संध्याकाळी पाच या वेळेत आयोजन करण्यात आले आहे. वारस नोंद विषयक प्रकरणे असलेल्या अधिकाधिक नागरिकांनी या फेरफार अदालतमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन कल्याण येथील भूमि अभिलेख विभागाचे उप अधीक्षक यांनी केले आहे.

ही फेरफार अदालत डोंबिवली पूर्वेतील सुनीलनगर मधील बहिणाबाई उद्यान परिसरातील परिक्षण भूमापक कार्यालय येथे आयोजित करण्यात आली आहे. या फेरफार अदालतमध्ये सहभागी होण्यासाठी नागरिकांनी आपल्या सर्व प्रकारच्या मूळ कागदपत्रांसह हजर राहावे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसात लोकाभिमुख आपल्या विभागांची कामे मार्गी लावण्याचे आदेश सर्व शासकीय कार्यालयांना दिले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या या नावीन्यपूर्ण कृती आराखड्याच्या उपक्रमातून फेरफार अदालतचा कार्यक्रम भूमि



अभिलेख विभागाकडून आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांना एकाच ठिकाणी आपले वारस नोंदीचे प्रश्न मार्गी लावण्याची संधी उपलब्ध होणार आहे, असे कल्याण भूमि अभिलेख विभागाच्या उप अधीक्षकांनी सांगितले.

भूमि अभिलेख विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या नगर भूमापन विभागातील मिळकत पत्रिकेवर वारस नोंद करणे, वारस पत्रावरून मयत व्यक्तिचे नाव कमी करणे, एखाद्याने जमीन खरेदीने, बक्षिसपत्र करून, हक्कसोड पध्दतीने घेतली असेल तर या कागदपत्रांच्या आधारे फेरफार नोंदणीचे काम या फेरफार अदालतमध्ये केले जाणार आहे. याशिवाय कुटुंबातील व्यक्ति मरण पावल्यानंतर त्याच्या नावे असलेली जमीन, मालमत्तांवरील नावे विहित मार्गाने कमी केल्यानंतर मयत व्यक्तीच्या वारसाच्या नावे ती मालमत्ता फेरफार नोंदीने होणे आवश्यक असते. या शिबिरात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन उप अधीक्षकांनी केले आहे.

## 'पितांबरी'चे रवींद्र प्रभुदेसाई यांचा जाहीर नागरी सत्कार

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

ठाणे शहराच्या उद्योग आणि सामाजिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी करणाऱ्या रवींद्र प्रभूदेसाई यांचा डि.लीट पदवी मिळाल्याबद्दल नागरी सत्कार व्हावा हा विचार पुढे आल्यानंतर प्रभुदेसाई यांच्या अनेक हितचिंतकांनी, मित्रांनी एकत्र येऊन नागरी अभिवादन सत्कार समिती स्थापन केली. याच नागरी अभिवादन सत्कार समितीच्या माध्यमातून गुरुवार, १७ एप्रिल रोजी रवींद्र प्रभूदेसाई यांचा जाहीर सत्कार आयोजित करण्याचं ठरवण्यात आले आहे. डॉ काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, हिरानंदानी मेडोज, ठाणे, येथे या जाहीर नागरी सत्काराचा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

पितांबरी उद्योग समूहाचे व्यवस्थापकीय संचालक रविंद्र प्रभुदेसाई यांना नुकताच टिळक



महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांच्या वतीने देण्यात येणारी डि.लीट ही अत्यंत मानाची पदवी प्रदान करण्यात आली. रवींद्र प्रभुदेसाई हे गेले अनेक वर्ष उद्योग क्षेत्रात कार्यरत आहेत. उद्योग क्षेत्रामध्ये यशस्वी होत असताना रवींद्र प्रभूदेसाई यांनी केवळ ठाणे शहरातीलच नाही तर महाराष्ट्रातील अनेक सामाजिक संस्थांना सढळ हस्ते मदत करून या संस्था उभ्या करण्यात मोठं सामाजिक योगदान दिलं आहे. रवींद्र प्रभूदेसाई यांचं उद्योग क्षेत्रात आणि सामाजिक क्षेत्रात ज्या पद्धतीने योगदान आहे तसेच अध्यात्मिक क्षेत्रात देखील त्यांनी मोठे योगदान दिलं आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ज्येष्ठ अणू शास्त्रज्ञ, संशोधक, पद्मविभूषण डॉक्टर अनिल काकोडकर आणि अध्यात्माचे उपासक, सुप्रसिद्ध व्याख्याते, डॉक्टर सच्चिदानंद शेवडे, सनातन संस्थेच्या सद्‌गुरु, अनुराधाताई वाडेकर यांच्यासह अनेक संस्थांचे प्रतिनिधी आणि ठाणेकर नागरिक उपस्थित राहणार आहेत.

## रोजगार मेळाव्यातून १२१ तरुणांना नोकरी

◆ मुरबाड (वार्ताहर) :

गेली बरेच वर्षापासून जनसेवा प्रतिष्ठान मार्फत विविध कार्यक्रम राबवून सातत्याने नागरिकांच्या समस्या सोडवण्याचे काम जनसेवा प्रतिष्ठान करत आहे. त्याच धर्तीवर गुरुवारी मुरबाड -कल्याण राष्ट्रीय महामार्ग असलेल्या शिवळे येथील व्हाईट हाऊस येथे जनसेवा प्रतिष्ठान मुरबाड आयोजित आवसर येच. आर. सर्व्हिस कंपनीच्या माध्यमातून फ्लिपकार्ट कंपनीमध्ये मुरबाड तालुक्यातील गरजू सुशिक्षित बेरोजगार तरुणाना उत्तम रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला . या रोजगार मेळाव्याला तालुक्यातून जोरदार प्रतिसाद मिळाला.



सदर रोजगार मेळाव्यात १२१ तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध करुन दिली. तसेच येण्या जाण्यासाठी बस सेवा उपलब्ध करून दिली आहे. जनसेवा प्रतिष्ठान मुरबाडचे अध्यक्ष सुभाष पवार, त्यांच्या समवेत रामभाऊ दळवी (आण्णा), धनाजी दळवी, मोहन भावार्थे, रघुनाथ इसामे, बळीराम आगिवळे, बळीराम म्हाडसे, सागर कडव सर्व रोजगार मेळव्यातील सदस्य उपस्थित होते.

याकामासाठी टिएल आर्यन दुबे, एचआर शाहीद शेख, विकास पांडे, आल्फिया खान, जयश्री गायकवाड यांचे सहकार्य लाभले. या रोजगार मिळवले जवळपास १२१ तरुणांना नोकरी संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल जनसेवा प्रतिष्ठानचे सर्वत्र आभार व अभिनंदन होत आहे.

## रिक्षाचालकांच्या बंद आंदोलनास उत्स्फूर्त प्रतिसाद

◆ डोंबिवली (वार्ताहर) :

डोंबिवली पश्चिमेत वाहतूक विभागाच्या गलथान कारभाराविरोधात आज एक मोठे जनआंदोलन उभारले गेले. उबाठा गटाचे कल्याण जिल्हा प्रमुख आणि माजी नगरसेवक दिपेश पुंडलिक म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली डोंबिवलीतील सर्व रिक्षा चालक-मालक युनियनच्या वतीने पं. दीनदयाळ उपाध्याय चौकात भव्य रिक्षा बंद आंदोलन व जोरदार निदर्शने करण्यात आली.

या सगळ्या समस्यांमुळे संतप्त झालेल्या रिक्षाचालकांनी एकत्र येत प्रशासनाचा निषेध केला. आंदोलनादरम्यान एसीपी संजय साबळे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील यांनी आंदोलकांच्या मागण्या मान्य करत त्वरित योग्य ती कारवाई केली जाईल, असे ठोस आश्वासन दिले. त्यामुळे आंदोलन महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून शांततेत स्थगित करण्यात आले. या आंदोलनात शिवसेना, युवासेना व महिला आघाडीच्या विविध पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या प्रमुख पदाधिकाऱ्यांमध्ये शहर प्रमुख प्रकाश तेलगोटे, उपशहर प्रमुख सुरज पवार, उपशहर संघटक संजय पाटील, ग्राहक संरक्षण पक्षाचे प्रमोद कांबळे व सुनील पवार, विभाग प्रमुख राजेश सावंत, श्याम चौगुले, प्रकाश खाडे, अर्जुन मौर्या, युवासेना विधानसभा अधिकारी आदित्य पाटील, शाखा प्रमुख अभय दिघे, मंगेश सरमळकर, युवासेना शाखा अधिकारी अनुज मोरे, जीत हाथी, मंथन साळवी, गोविंद कुलकर्णी, स्वप्नील पाटील, यश कदम, तसेच परेश म्हात्रे, विपुल म्हात्रे, चेतन म्हात्रे यांचा ठाम सहभाग होता.

## ठाणे ग्रामीणमध्ये 'अजित पर्व' कार्यक्रमांतर्गत संवाद मेळावा

◆ मुरबाड (वार्ताहर) :

राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी विभाग आयोजित अजितपर्व - पदाधिकारी संपर्क अभियानांतर्गत ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणरावजी आखाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ठाणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसची कार्यकारणीची बैठक जिल्हाध्यक्ष भरत गोंधळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी ओबीसी जोडो यात्रा संपूर्ण महाराष्ट्र भर राबविण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस ओ. बी. सी. विभागाचे प्रदेश अध्यक्ष कल्याण आखाडे यांनी दिली आहे.

ठाणे जिल्हामध्ये एक कणखर ओबीसी नेतृत्व निर्माण करून संपूर्ण ठाणे जिल्ह्यातील तालुक्यामध्ये ओबीसी तालुका अध्यक्ष नेमून आपली ओबीसी कार्यकारिणी स्थापन करणं गरजेचं आहे असं आखाडे यांनी म्हटलं आहे. मजबुतीने व तातडीने संघटना बांधणी करण्याच्या सूचना



देऊन ओबीसी समाज राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुख्य प्रवाहासोबत मोठ्या संख्येने जोडण्यासाठी ओबीसी विभागाच्या सगळ्याच पदाधिकाऱ्यांनी कार्यरत राहण्याचे आवाहन यावेळी आखाडे यांनी केले.

या बैठकीमध्ये प्रदेश चिटणीस डी. के. विशे , ठाणे जिल्हा ग्रामीण महिला अध्यक्षा कल्पना तारमळे, राष्ट्रवादी काँग्रेस युवक ठाणे जिल्हा अध्यक्ष प्रतीक हिंदुराव, प्रांतिक सदस्य रवींद्र परटोळे, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत एगडे, प्रवीण देशमुख, शांताराम पाटील, जिल्हा सरचिटणीस प्रभाकर शेळके, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक अरुण जाधव, कल्याण तालुका अध्यक्ष बाळाराम कोर, मुरबाड अध्यक्ष बोष्टे, भिवंडी कार्याध्यक्ष विनोद पाटील, शहापूर तालुका अध्यक्ष मनोहर सासे, महिला अध्यक्ष सौ. सविता मोरगे, युवक अध्यक्ष दिनेश चंदे, दिलशान शेख यासह ठाणे जिल्हा ग्रामीण मधील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

## भिवंडीमध्ये महात्मा जोतिबा फुले जयंती संपन्न

**भिवंडी :**महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर (भा. प्र.से.) यांचे निर्देशानुसार ११ एप्रिल रोजी थोर समाजसेवक महात्मा जोतिबा फुले यांची महानगरपालिका मुख्यालयात तळ मजल्यावर विठ्ठल डाके,अतिरीक्त आयुक्त, यांचे हस्ते महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी रोहिदास दोरकुळकर, उपायुक्त (मुख्यालय), विक्रम दराडे, उपायुक्त (आरोग्य), बाळकृष्ण क्षीरसागर, उपायुक्त (कर), नितीन पाटील, सहायक आयुक्त (कर), राजेश पवार, अग्निशमन अधिकारी, नितेश चौधरी, विभाग प्रमुख (समाज कल्याण),मिलींद पळसुले, विभाग प्रमुख क्रिडा व सुरक्षा विभाग आणि महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

### खासदार श्रीकांत शिंदे यांचे स्वप्न खरे होणार

# ईएसआयसी कामगार रुग्णालयाचे काम ९०% काम पूर्ण

◆ उल्हासनगर(वार्ताहर):

ठाणे जिल्ह्यातील लाखो कामगाराना उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी तब्बल १०२ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येत असलेले सुपर स्पेशलिटी कामगार रुग्णालयाचे काम शेवटच्या टप्प्यात आले आहे. रुग्णालयाचे काम ९० टक्के पूर्ण झाले असून खासदार श्रीकांत शिंदे यांचे स्वप्न खरे होणार आहे.

उल्हासनगर कॅम्प ३ मधील शासकीय मध्यवर्ती रुग्णालयाच्या बाजूला कामगार रुग्णालय आहे. या कामगार रुग्णालयातून डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, भिवंडी आणि बदलापूर येथील औद्योगिक क्षेत्र आणि लहान-मोठ्या कारखान्यातील सुमारे तीन लाख कामगारांना १९७१ पासून आरोग्य सेवा पुरवली जात होती. २०१५मध्ये या रुग्णालयाची इमारत धोकादायक असल्याचा अहवाल मुंबई आयआयटीकडून देण्यात आला.



तेव्हा खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी मोडकळीस आलेल्या, जर्जर झालेल्या धोकादायक इमारतीच्या जागी नवीन सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभे रहावे ह्यासाठी केंद्राकडे सातत्याने पाठपुरावा करून रुग्णालयासाठी १०२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला होता.

२०१९ मध्ये खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते नवीन इमारत बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले होते. त्यावेळी कार्यरत असलेले कामगार रुग्णालय स्थलांतरित करणे गरजेचे होते. परंतु याकरिता ईएसआयसीकडून अनेकदा निविदा काढून सुद्धा प्रक्रियेस यश आले नाही. ईएसआयसीने रुग्णालयाकरिता नवीन जागा निश्चित करीत चार वर्षांपूर्वी पवई येथील शिवसदन इमारतीत स्थलांतरण केले. त्यानंतर तात्काळ जुनी इमारत पाडून ईएसआयसीने नेमलेल्या ठेकेदारामार्फत कामगार रुग्णालयाच्या दोन मजली इमारतीचे बांधकाम तसेच रहिवासी इमारतींचे बांधकाम हे सुरू झाले.

१०० बेडच्या या रुग्णालयाकरिता २ लाख चौरस फुटांचे दोन मजली इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. त्यातील अंदाजे १ लाखापेक्षा अधिक चौरस फूट क्षेत्र हे रुग्णालयाचे आहे. यासाठी केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता किशन अवतार मीना यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक अभियंता रणजीत बोटे, प्रकल्प व्यवस्थापक संजीव गुप्ता, कनिष्ठ अभियंता रोहित कुमार, बांधकाम व्यवस्थापक समीर पाटील यांच्या टीमने तीन वर्षात रुग्णालयाचे काम शेवटच्या टप्प्यात आणले आहे.

या कामगार रुग्णालयात विविध वॉर्ड मध्ये मिळून ११५ बेड असणार आहे. १० आयसीयू, ९६ सर्वसाधारण, ६ आपत्कालीन बेड असतील. हे रुग्णालय संपूर्ण वातानुकूलित असून यंत्रणा लावण्यात आली आहे. फिजियोथेरेपी, आपत्कालीन ट्राम वॉर्ड, रेडिओलॉजी विभाग, आय.सी. यु., एन.आय.सी.यु., अल्ट्रासाऊंड आदी सुविधांनी सुसज्ज आहे.

कामगार रुग्णालयाची इमारत ही पूर्णपणे सोलर विजेवर चालणार आहे. इमारतीमध्ये खिडकीच्या जाळीपसून शिडीच्या रेलिंग पर्यंत संपूर्णपणे स्टील रेलिंग बसविण्यात आली आहे.

### शंभर दिवसांत होणार काम पूर्ण

कामगार रुग्णालय हे एक अत्याधुनिक स्वास्थ्य केंद्र असणार आहे. याद्वारे परिसरातील लाखो लाभार्थी कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांना आजारपणात तसेच अपघातग्रस्ताना तातडीने वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी या रुग्णालयाचा फायदा होणार आहे. येत्या शंभर दिवसात रंगरंगोटी, स्वच्छता, शस्त्रक्रिया विभागाचे काम, फर्निचर, प्रतीक्ष कक्षात खुर्च्या बसविण्याचे काम हे युद्ध पातळीवर पूर्ण करणार असल्याचा मानस केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंतांनी व्यक्त केला आहे.


# टीजेएसबी बँकेचे आर्थिक निकाल जाहीर

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

देशातील बहुराज्जीय सहकारी बँकांपैकी एक असलेल्या टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेडने सलग दहा वर्षांहून अधिक काळ दरवर्षी १० एप्रिल रोजी आर्थिक निकाल जाहीर करण्याची परंपरा जपत आज २०२४–२५ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित आर्थिक निकाल जाहीर केले आहेत. नव्या कोर बँकिंग प्रणाली (CBS) अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवरही बँकेने सातत्य कायम ठेवत पारदर्शकता आणि वेळेवर आर्थिक माहिती सादर केली आहे.

टीजेएसबी सहकारी बँकेने या वर्षी अनेक महत्त्वाचे टप्पे गाठले. महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या शासन निर्णयामुळे आता बँकेला शासकीय अधिकाऱ्यांचे, कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्यांचे प्रदान करण्यासाठीचे खाते आणि निवृत्ती वेतनधारकांचे वैयक्तिक बँक खाते उघडण्याकरिता; तसेच सार्वजनिक उपक्रम/ महामंडळे यांचेकडील अतिरिक्त निधी गुंतवणूकरिता प्राधिकृत मान्यता मिळाली आहे.

बँकेचे अध्यक्ष शरद गांगल म्हणाले, "या वर्षीची कामगिरी केवळ आमच्या मजबूत आर्थिक पाया सिद्ध करत नाहीतर, सहकारी बँकिंगमधील नवे मापदंडही निश्चित करते. नव्या कोर बँकिंग प्रणालीमुळे व्यवहारांची गती, सुरक्षितता आणि उपलब्धता वाढली आहे. ग्राहक प्रथम हेच आमचे धोरण असून, भविष्यातील नवकल्पनांचा पाया मजबूत करण्याचा आमचा प्रयत्न आहे."




बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर म्हणाले, "शासन निर्णय आणि यशस्वी विलीनीकरण हे आमच्या गुणवत्तापूर्ण सेवा व नावीन्यपूर्ण दृष्टिकोनाचे फलित आहे. या टप्प्यामुळे आम्हाला शासकीय विभागांची,कर्मचाऱ्यांची सेवा करण्याची आणि आमचे नेटवर्क वाढवण्याची संधी मिळाली आहे." टीजेएसबी सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सीए वैभव सिंगवी, मान्यवर संचालक मंडळ सदस्य आणि वरिष्ठ अधिकारी या पत्रकार परिषदेस उपस्थित होते.

**मुख्य आर्थिक बाबी**

| | |
|---|---|
| एकूण उलाढाल | २३,१०४.८२ कोटी |
| ठेवी | १४,८४८.६४ कोटी |
| कर्जे | ८,२५६.१८ कोटी |
| ढोबळ नफा | २५२.०७ कोटी |
| ढोबळ अनुत्पादित कर्जे | ३.५९% |
| निव्वळ अनुत्पादित कर्जे | ०% |

## ऐतिहासिक स्थळांना जोडणारे 'ट्रेन सर्किट' स्वागतार्ह

महाराष्ट्रामध्ये इतिहासप्रेमी नागरिकांची संख्या आजही लाखोंच्या घरामध्ये आहे. ऐतिहासिक गड-किल्ले, राजवाडे, स्मृतिस्थळे, नदी, सागर, तलाव, ऐतिहासिक लढायांची ठिकाणे, राजवाडे हे सर्व पाहण्यासाठी, तेथील इतिहासकालीन घडामोडींचा आढावा घेण्यासाठी इतिहासप्रेमींची कायम तगमग असते. धकाधकीच्या काळामध्ये पर्यटनाच्या माध्यमातून वेळ मिळेल तेव्हा इतिहासप्रेमी आपली 'तलफ' भागविण्यासाठी एसटी, रेल्वे तसेच खासगी वाहनांच्या माध्यमातून त्या ठिकाणी जाऊन इतिहासाचा मागोवा घेत असतात. यासाठी त्यांना प्रवासासाठी प्रचंड त्रासाचा सामना करावा लागतो, दगदग सहन करावी लागते. इतिहासप्रेमींची ही तगमग लक्षात घेऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सत्तेवर येताच त्यांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी त्यांनी केंद्र सरकारकडेदेखील पाठपुरावा केला आहे. त्या प्रयत्नांची, पाठपुराव्याची दखल केंद्र सरकारने घेतली असून त्यांच्या परिश्रमाला केंद्राकडूनही कृतीतून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. काँग्रेसची केंद्रात व राज्यात एकहाती सत्ता असतानाही इतिहासप्रेमींसाठी काही केले नाही, पण भाजपाने 'करून दाखवले', त्याचीच परिणती म्हणून लवकरच केंद्र सरकारच्या रेल्वे विभागाच्या माध्यमातून लवकरच महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन सुरू होणार आहे. महाराष्ट्राच्या विकासामध्ये आता रेल्वेची भूमिका निर्णायक राहणार असून त्यादृष्टीने रेल्वेने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. महाराष्ट्रात १ लाख ७३ हजार कोटींची कामे सुरू आहेत. यात मुंबईसह इतर परिसरात १७ हजार कोटींची कामे सुरू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासोबत घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेमुळे महाराष्ट्राबाबत रेल्वेचे सुरू असलेले प्रकल्प, विकासाच्या योजना याबाबत माहिती मिळाल्याने महाराष्ट्रामध्ये रेल्वे राबवत असलेल्या प्रकल्पाची महाराष्ट्रीय जनतेला माहिती झाली. मुंबईतील अनेक रेल्वे प्रकल्पांची कामं प्रगतिपथावर आहेत. राज्यातील १३२ रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास करण्यात येणार आहे. महाराष्ट्रासाठी १ लाख ७३ हजार कोटींचे रेल्वे प्रकल्प उभारले जाणार आहेत. यावर्षी जवळपास २४ हजार कोटी राज्याला मिळाले आहेत. राज्यात छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन सुरू करणार आहे. या सर्किट ट्रेनने राज्यातील ऐतिहासिक स्थळांना भेट देता येणार आहे. सर्किट ट्रेनने १० दिवस प्रवास करता येणार आहे. विदर्भाचा छत्तीसगड-तेलंगणासोबतचा व्यवहार वाढणार आहे. गोंदिया बल्लारशा रेल्वे लाईनचा दुहेरीकरण याकरिता ४८१९ कोटी रुपये हे केंद्र सरकारने या ठिकाणी दिलेले आहेत आणि यामुळे निश्चितपणे जो विदर्भाचा भाग आहे, त्याला एक मोठा फायदा होणार आहे. विशेषतः छत्तीसगड आणि तेलंगणाचा जो व्यापार आणि व्यवहार आहे हा विदर्भाचा विकास होण्यासाठी, कायापालट होण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. गोंदिया अशा ठिकाणी आहे की, जिथे मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या दोघांची बॉर्डर आहे आणि पलीकडे बल्लारशापासून तेलंगणा आणि तिकडे आंध्र प्रदेश आपल्याला मिळतो. त्यामुळे अतिशय स्ट्रॅटेजीक अशा प्रकारची ही जी लाईन आहे. महाराष्ट्रातील १३२ रेल्वे स्थानकांचा केंद्र सरकारकडून विकास केला जाणार आहे. या रेल्वे स्थानकांचा विकास रेल्वे मंत्रालय करणार आहे. त्यामध्ये मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचाही समावेश आहे.

महाराष्ट्राच्या विकासाला केंद्राकडून नेहमीच झुकते माप दिले जाणार असल्याची घोषणा पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा सातत्याने भाषणातून, विविध कार्यक्रमातून करत असतात. त्या घोषणा या केवळ घोषणा न राहता, त्या प्रत्यक्षात साकारल्या जात असल्याचे नेहमीच कृतीतूनही पाहावयास मिळत आहे. रेल्वेच्या अर्थसंकल्पामध्ये १ लाख ७३ हजार कोटी रुपये महाराष्ट्राला मिळालेले आहेत. २०१४ पूर्वीचा मागोवा घेतल्यास यूपीए सरकारच्या काळात त्यांनी महाराष्ट्राला दहा वर्षांत दहा हजार कोटी रुपये देखील एकत्रितपणे दिलेले नाहीत. छत्रपती शिवाजी महाराज सर्किट हा प्रकल्प महाराष्ट्रातील इतिहासप्रेमींच्या पर्यटनाला चालना देणारा प्रकल्प ठरणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची ऐतिहासिक स्थळे आणि राज्यातील इतर सांस्कृतिक स्थळे पाहता यावीत याकरिता केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने नवी योजना आणली आहे. त्यानुसार, छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन सुरू करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन सुरू होणार आहे. ज्यामध्ये सुंदर अशा प्रकारची आयकॉनिक रेल्वे सुरू होईल. यामार्फत दहा दिवसांची टूर केली जाईल. छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले, जागा, त्यांच्याशी संबंधित इतर सांस्कृतिक स्थळांना ही रेल्वे जोडणार आहे. गोंदिया-बल्लारशा रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाकरिता ४ हजार ८१९ कोटी रुपये केंद्र सरकारने दिले आहेत. यामुळे निश्चितपणे विदर्भाला मोठा फायदा होणार आहे. छत्तीसगड आणि तेलंगणासाठी व्यापार, व्यवहार वाढण्याच्या दृष्टीने ही महत्त्वाची रेल्वे लाईन आहे. गोंदियातून मध्य प्रदेश आणि छत्तीसगडची सीमा आहे. त्यामुळे स्ट्रॅटेजिक लाईन मंजूर झाल्याचे खरे श्रेय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आहे. १ लाख ७३ हजार कोटी रुपये केंद्र सरकार रेल्वे इन्फ्रावर खर्च करत आहे. महाराष्ट्रातील सर्व महत्त्वाच्या स्थानकांचे वर्ड क्लास ट्रान्स्फर्मेशन होत आहे. शिवरायांच्या इतिहासाचे दर्शन घडवणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन ही १० दिवसांची रेल्वे टूर असणार आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून आता लवकरच सुरू होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज सर्किटच्या माध्यमातून ज्यामध्ये अतिशय सुंदर अशा प्रकारची आयकॉनिक रेल्वे दहा दिवसांचा टूर हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जी काही विविध महत्त्वाचे किल्ले आहेत किंवा जागा आहेत आणि अर्थातच त्यांच्याशी संबंधित इतर सांस्कृतिक स्थळ आहेत, याला जोडणारी सुरुवात ही रेल्वे विभाग त्या ठिकाणी करत आहे. महाराष्ट्रात रेल्वेच्या पायाभूत सुविधांना चालना देण्यासाठी केंद्र सरकारने १ लाख ७३ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या प्रकल्पांमुळे राज्यात रेल्वेचे जाळे विस्तारेल आणि विशेषतः विदर्भाला मोठा फायदा होईल. केंद्र सरकारच्या रेल्वेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत विकासाचे जाळे निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यासाठी राज्याला अधिकाधिक निधी उपलब्ध करून दिला जात आहे. रेल्वे स्थानकांचेही सुशोभीकरण केले जात आहे.

# समाज-डॉक्टरांमध्ये संवाद प्रक्रियेची गरज



**दीपक जाधव**
**आरोग्य हक्क कार्यकर्ते**

दीनानाथ रुग्णालयातील घटनेनंतर शासनाकडून तीन चौकशी समिती नेमल्या गेल्या. मात्र आजपर्यंतचा अनुभव पाहता शासनाकडून फारशा बदलाची अपेक्षा नाही. त्याऐवजी डॉक्टरांच्या संघटना-सामाजिक संघटनांनी एकत्र येऊन संवादाचे उपक्रम सुरू करणे, स्वनियमन करणे, अविश्वासाचे वातावरण दूर करणे, डॉक्टरांवर हल्ले झाल्यास पोलिसांकडून कठोर कारवाई होणे आदी सुधारणांची अंमलबजावणी करावी लागेल.

दीनानाथ रुग्णालयामधील ताज्या घटनेनंतर राज्यभरातून खासगी हॉस्पिटलविरोधात तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, आरोग्य हक्क कार्यकर्ते, सोशल मीडिया आदी सर्वांकडून याबाबत तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. एकूणच लोकांमध्ये खासगी हॉस्पिटल, तिथले डॉक्टर यांच्याविषयी अविश्वासाची भावना तयार झाली आहे. दुसरीकडे, लोकांच्या या प्रतिक्रियांमुळे डॉक्टरांनाही असुरक्षितता जाणवू लागली आहे. या परिस्थितीमध्ये लवकर सुधारणा न झाल्यास अनेक गंभीर परिणामांना समाजाला सामोरे जावे लागू शकते. खासगी हॉस्पिटलच्या नियमनाची जबाबदारी असलेले राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्थांचे आरोग्य विभाग यांना पूर्ण अपयश आले आहे. त्यामुळे डॉक्टर, इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए), सामाजिक संघटना, राजकीय पक्ष या सगळ्यांना एकत्र आणून एक संवाद प्रक्रिया तातडीने सुरू करण्याची गरज आहे.

यासाठी आयएमए तसेच सामाजिक संघटनांच्या माध्यमातून वेगवेगळ्या शहरांमध्ये संवादाचे कार्यक्रम आणि दीर्घकालीन भरीव उपक्रम सुरू करता येऊ शकतील. राज्यात सेवाभावी वृत्तीने प्रामाणिक प्रॅक्टिस करणारे डॉक्टरही मोठ्या संख्येने आहेत. वैद्यकीय व्यवसायात सुरू झालेल्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी अशा डॉक्टरांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरू शकतो. दीनानाथ रुग्णालयात एकरकमी दहा लाख रुपये डिपॉझिट न भरल्याने एका अत्यवस्थ गर्भवती महिलेवर उपचार करण्यास विलंब करण्यात आला. त्यातून त्या महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप तिच्या कुटुंबीयांच्या वतीने करण्यात आला. घटना घडून गेल्यानंतर चार-पाच दिवसांनी सोशल मीडियावर याविषयी लिहिले गेले. शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी याबाबत एक फेसबुक पोस्ट लिहिली. आमदार अमित गोरखे यांचाही याबाबतचा एक व्हीडिओ देखील व्हायरल झाला.

**दहा लाखांचे डिपॉझिट हा ट्रिगर पॉईंट**

दहा लाख इतकी मोठी रक्कम डिपॉझिट म्हणून मागितली जाणे, डिपॉझिट भरल्याशिवाय अत्यवस्थ गर्भवती महिलेवर उपचार सुरू न करणे हा यातला ट्रिगर पॉईंट होता. त्याचबरोबर ती महिला आमदार अमित गोरखे यांच्या स्वीय सहाय्यकांची पत्नी होती. मंत्रालयातून फोन येऊनदेखील त्या महिलेवर उपचार सुरू करण्यात आले नाहीत. राजकीय पाठबळ असलेल्या व्यक्तीबाबत असे घडते आहे, तर सामान्य माणसांना काय भोगावे लागते याच्या व्यथा मांडल्या जाऊ लागल्या. सोशल मीडियावर या विरोधात जोरदार प्रतिक्रिया उमटू लागल्यानंतर पुण्यातील प्रमुख वृत्तवाहिन्यांच्या बातमीदारांनी दीनानाथ रुग्णालयाच्या गेटसमोरून लाईव्ह वृत्तांकन सुरू केले. त्या पाठोपाठ विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांची आंदोलने तिथे सुरू झाले. त्यानंतर या विषयाला राज्यव्यापी स्वरूप प्राप्त झाले. दीनानाथ रुग्णालयातील ही घटना एका रुग्णालयापुरती मर्यादित न राहता सर्वच खासगी हॉस्पिटलच्या गैरप्रकारांना या निमित्ताने वाचा फुटली. खासगी रुग्णालयांकडून मोठ्या रकमेच्या डिपॉझिटची मागणी केली जाणे, अवाजवी बिलआकारणी केली जाणे, अनावश्यक महागड्या तपासण्या करायला लावणे, अनेकदा अनावश्यक शस्त्रक्रिया केल्याचे प्रकार, औषधांच्या भरमसाठ वाढवण्यात आलेल्या किंमती आदी अनेक गैरप्रकार या निमित्ताने चर्चेत आले.

**आयएमएची भूमिका**

डॉक्टरांची संघटना असलेल्या इंडियन मेडिकल असोसिएशनच्या पुण्यातील शाखेने याबाबत एक निवेदन प्रसिद्धीला दिले. त्यामध्ये दीनानाथच्या घटनेनंतर डॉक्टरांमध्ये असुरक्षिततेचे व भयाचे वातावरण तयार झाले असल्याचे नमूद करण्यात आले. याचा मोठा फटका छोट्या दवाखान्यांना बसण्याची भीती व्यक्त करण्यात आली. डिपॉझिट घेतल्याशिवाय आम्ही उपचार करू शकणार नाही अशीही भूमिका त्यांनी मांडली आहे. आयएमएला खरा पुढाकार घ्यावा लागेल. डॉक्टरांची प्रमुख संघटना असलेल्या आयएमएला यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावता येऊ शकेल. त्यांना संवादासाठी पहिल्यांदा हात पुढे करावा लागेल. डॉक्टरांच्या कुठल्याही गैरप्रकारांना पाठीशी न घालता चुकीला चूक म्हणण्याचे धाडस पहिल्यांदा दाखवावे लागेल. त्याचबरोबर मोठ्या रकमेच्या डिपॉझिटची मागणी, अवाजवी बिलआकारणी, कट प्रॅक्टिस या विरोधात ठोस भूमिका जाहीर करावी लागेल. आपल्या संघटनेच्या सदस्य डॉक्टरांना निर्देश देऊन स्वनियमनाचा मार्ग अवलंबावा लागेल. त्यानंतर विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष, आरोग्य हक्क कार्यकर्ते यांच्याशी संवादाचा उपक्रम हाती घ्यावा लागेल. तरच या तणावाच्या परिस्थितीमध्ये काही सकारात्मक बदल घडू शकते. अन्यथा, दोन्ही बाजूंनी टोकाच्या भूमिका घेतल्यास येत्या काळात परिस्थिती आणखी बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**हिंसेचा सर्व स्तरातून निषेध व्हावा**

अनेकदा रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांवर हल्ले झाल्याच्या बातम्या समोर येतात. दीनानाथच्या घटनेनंतर डॉ. घैसास यांच्या आईच्या दवाखान्याची भाजपाच्या महिला कार्यकर्त्यांनी तोडफोड केली. काही आंदोलकांनी दीनानाथ रुग्णालयाच्या फलकांना काळे फासले, रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांवर चिल्लर फेकली. स्टंटबाजी करणाऱ्या अशा आंदोलनांचा, हिंसक प्रतिक्रियांचा सर्वच स्तरातून तीव्र निषेध केला गेला पाहिजे. अशा घटना वारंवार घडू लागल्या, तर अत्यवस्थ रुग्णांवर उपचार करायला डॉक्टर बजावणार नाहीत त्याचे गंभीर परिणाम समाजाला भोगावे लागू शकते हे लक्षात घ्यावे लागेल.

आरोग्य हक्कांवर काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांकडून खासगी हॉस्पिटलचे शासनाकडून योग्य ते नियमन झाले पाहिजे अशी मागणी सातत्याने करण्यात येत आहे. विशेषतः कोविडच्या काळात अवाजवी बिल आकारणीचे अनेक प्रकार उजेडात आले. त्यानंतर महाराष्ट्र नर्सिंग होम ॲक्टमध्ये १४ जानेवारी २०२१ रोजी काही महत्त्वाच्या सुधारणा करून सुधारित ॲक्ट प्रकाशित करण्यात आला. त्यामध्ये सर्व खासगी हॉस्पिटलनी त्यांचे दरपत्रक, रुग्ण हक्कांची सनद आणि महापालिकेच्या तक्रार निवारण कक्षाचा टोल फ्री क्रमांक दर्शनी भागात लावणे बंधनकारक करण्यात आले. मात्र अनेक खासगी रुग्णालये दर्शनी भागात दरपत्रक लावणे, त्यानुसार बिलआकारणी करणे याचे पालन करताना दिसून येत नाहीत.

**रुग्ण हक्कांचेही उल्लंघन**

या कायद्याने अत्यवस्थ रुग्णांवर तातडीने उपचार करणे, त्यांच्याकडे डिपॉझिटची मागणी न करणे, बिल भरले नाही म्हणून मृतदेह अडवू नये, रुग्णांना त्यांच्या आजाराची सर्व माहिती वेळोवेळी द्यावी, रुग्णांना सर्व तपासण्यांचे रिपोर्ट व इतर उपचारांची कागदपत्रे उपलब्ध करून द्यावेत असे अधिकार त्यामध्ये नमूद केले आहेत. मात्र खासगी हॉस्पिटलकडून या अधिकारांचे सर्रास उल्लंघन केले जाते. खासगी हॉस्पिटलविरोधात रुग्णांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना तक्रारी करता याव्यात यासाठी तक्रार निवारण कक्ष कार्यान्वित करणे कायद्याने बंधनकारक आहे. महापालिका (शहर कार्यक्षेत्र) जिल्हा परिषद (तालुका स्तर) तसेच सिव्हिल हॉस्पिटल (सर्व ग्रामपंचायत) येथे हे तक्रार निवारण कक्ष सुरू करणे अपेक्षित आहे. ॲडमिट असलेल्या रुग्णाच्या नातेवाईकाने तक्रार केल्यास २४ तासांच्या आत तसेच डिस्चार्ज झालेल्या रुग्णाच्या तक्रारींची एक महिन्याच्या आत सुनावणी घेऊन त्याबाबतचा निकाल या कक्षांनी देणे बंधनकारक आहे. मात्र राज्यभरात अशा किती सुनावण्या घेतल्या गेल्या याची यादी शासनाने प्रसिद्ध करायला हवी. हा आकडा हाताच्या बोटावर मोजण्याइतपतही येणार नाही.

एकूणच आपण केलेल्या नियमांचा शासनालाच विसर पडल्याचे दिसून येते. खासगी हॉस्पिटलचे योग्य त्या प्रकारे नियमन होत नसल्याने अनेक अडचणी निर्माण होत आहेत. दीनानाथच्या घटनेनंतर शासनाकडून तीन चौकशी समिती नेमल्या गेल्या. त्याचबरोबर आम्ही हे करू, ते करू अशी आश्वासने शासन देत आहे. मात्र आजपर्यंतचा अनुभव पाहता शासनाकडून फारशा बदलाची अपेक्षा ठेवता येत नाही. त्याऐवजी डॉक्टरांच्या संघटना, सामाजिक संघटना यांनी एकत्र येऊन संवादाचे उपक्रम सुरू करणे, स्वनियमन करणे, अविश्वासाचे वातावरण दूर करणे, समाजातूनही डॉक्टरांविरुद्ध हिंसात्मक प्रतिक्रिया नोंदवल्या गेल्यास पोलीस प्रशासनाकडून कठोर कारवाई, होणे आदी सुधारणांची अंमलबजावणी करावी लागेल.

# चला गावाला जाऊया...





**रवींद्र तांबे**

गावामध्ये रोजगाराच्या संधी नसल्यामुळे गावातील नागरिक रोजीरोटीसाठी शहराकडे जातात. त्यामुळे आज ग्रामीण भागात गेल्यावर बरीच घरे बंद असताना दिसतात. कधी एकदा मुलांची परीक्षा संपते आणि गावी जाऊन येतो असे चाकरमान्यांना झाले आहे. कोकणात शहरात राहणाऱ्या व्यक्तीला चाकरमानी असे आदराने गावातील लोक म्हणतात. तसे गावी गेल्यावर गावची मंडळी त्यांचा पाहुणचार सुद्धा आदराने करतात. त्याप्रमाणे चाकरमानी पुन्हा परतीच्या प्रवासाला निघतात तेव्हा त्याच्या हातात पानसुपारीसाठी दोनशे किंवा पाचशे रुपयाची करकरीत नोट ठेवायला विसरत नाहीत.

दहावी आणि बारावीची बोर्डाची परीक्षा संपली तरी अजून प्राथमिक, माध्यमिक आणि विविध पदव्यांच्या परीक्षा अजून बाकी आहेत. मी लहान असताना माझ्या आयनल गावी उन्हाळ्याच्या सुट्टीत वाडीतील मंडळी गावी आल्यावर मी त्यांना विचारायचो कोणत्या गाडीने आलाय? तेव्हा प्रभाकरची आई म्हणायची 'रातराणी' गाडीने...! मला प्रश्न पडायचा लालपरी म्हणतात. मग हिची 'रातराणी' गाडी कोणती, असा प्रश्न मला पडायचा. तेव्हा एक दिवस एका एसटी वाहकाला विचारले की 'रातराणी' हा गाडीचा प्रकार कोणता? तेव्हा त्यांनी मला सांगितले, ही दुसरी तिसरी गाडी नसून आपली सर्वांची लालपरी. ती रात्रीची येते म्हणून तिला चाकरमानी मंडळी 'रातराणी' म्हणतात. आता मात्र चाकरमानी लालपरीकडे प्रवासासाठी दुर्लक्ष करतात. आता सर्रास रेल्वेने येतात. काही चाकरमानी तर आपली स्वतःची गाडी घेऊन येतात. त्यामुळे लांब पल्ल्याच्या लालपरी बऱ्याच ठिकाणी बंद करण्याची वेळ आली आहे. असे असले तरी काही मंडळी लालपरीने येणे पसंत करतात. तेव्हा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवासी वाहतूक करत असताना प्रवाशांच्या सेवेसाठी आणि चांगल्या प्रकारची सेवा देणे गरजेचे आहे. कारण बारा ते पंधरा तास प्रवास करायचा असेल, तर प्रवाशांना चांगल्या प्रकारच्या सेवा देणे गरजेचे असते. त्यात रस्त्याची कामे सुरू आहेत. त्यामुळे चाकरमानी रेल्वेने जाणेच पसंत करतात. असे असले तरी लालपरीचा प्रवास अधिक सुखाचा असतो. प्रत्येक आगारात बस थांबते त्यामुळे प्रत्येक आगाराची रचना अशी असते हे त्यानिमित्ताने जवळून पाहता येते.

कितीही झाले तरी उन्हाळ्याच्या सुट्टीत प्रत्येक जण आपल्या गावी जाऊन येतात. प्रत्येकाला आपल्या गावाची ओढ असते. त्यामुळे न चुकता गावी जातात. कोकणात तर मे महिना सोडा, सणासुदीच्या दिवसातही जर रजा मिळाली नाही तर लोक म्हणातात नोकरीचे काय होईल ते होईल, पुढे पाहू; परंतु गावी जाऊन येतात. इतका कोकणी माणूस श्रद्धाळू आहे. त्याचमुळे म्हटले जाते की, कोकणची माणसं साधी भोळी... काळजात त्यांच्या भरली शहाळी...!! उन्हाळा सुरू झाल्यावर त्यांना गावची आठवण येत आहे. जो तो जुन्या आठवणींना उजाळा देत आहेत. वर्षभरानंतर जिवाभावाची माणसे भेटणार आहेत. काहीजण तिकीट काढून एक एक दिवस कसा जातो हे मोजत आहेत.

लहान मुले तर आजी-आजोबांची आठवण काढत आहेत. आजोबांच्या मांडीवर कधी बसतो असे झाले आहे. तसेच गावच्या काकांची व वाडीतील मुले आपली वाट पाहत असतील. त्यांना केव्हा एकदा भेटतो आणि आपल्या गावच्या गोट्यात बांधलेल्या बैलांना बिस्कीट त्यांच्या तोंडासमोर केव्हा टाकतो असे मुलांना वाटत आहे. संध्याकाळी घरासमोरील वाफ्यात केव्हा एकदा वाडीतील मुलांना घेऊन क्रिकेट खेळतो असे झाले आहे. दुसऱ्या दिवशी गावच्या काकांबरोबर बैलांना घेऊन रानात जाणार. रानातील भरडावर फिरताना किंवा कुंभयाच्या झाडाखाली बसून समोरच्या डोंगरातील झाडे मोजताना तसेच आंब्याच्या झाडावर दगड गावच्या मुलांबरोबर मारताना एक वेगळीच मजा असते. काकाने करवंदे काढून कुंभयाच्या पानात द्यायची आणि आपण त्यावरती ताव मारायचा. नंतर संध्याकाळी चुलीवरचे काकूने केलेले जेवण जेवल्याने सकाळ केव्हा व्हायची हे समजत सुद्धा नाही.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी काकू चुलीत काजू भाजून नंतर फोडून द्यायची. आठवड्याच्या बाजाराला जाऊन मासे आणून मासे तळलेले व माशांचा सार उत्तम करायची. मात्र तेवढीच गावची माणसे दररोज वेगवेगळ्या पद्धतीने पाहुणचार करत असतात. जसजसे परतीचे दिवस जवळ येतात तस तसे मन भरून येत असते. असे वाटते आता शहरात जाऊच नये. मात्र चाकरमानी परतीच्या प्रवासाला निघतात तेव्हा गावची माणसे ढसढसा रडायला लागतात. कारण आपल्या मायेची माणसे असतात. गेली पंधरा दिवस एकत्र राहिलो. आता भेट वर्षान मग आजी म्हणायची, जगाचं वाचातं ता पुढच्या वर्षी भेतात. बंदिस्त घरात राहणारे चाकरमानी गावी आल्याने खऱ्या अर्थाने गावच्या माणसांमुळे मोकळा श्वास घेऊ लागले आहेत. हा मोकळा श्वास केवळ आणि केवळ गावच्या रक्ताच्या नात्याने शक्य होत असते. तेव्हा उन्हाळा आल्यावर प्रत्येक चाकरमानी म्हणतात चला गावाला जाऊया..!

## राशिभविष्य

शनिवार ,१२ एप्रिल २०२५

**|| पंचांग ||**

आज मिती चैत्र शुद्ध एकादशी. शके १९४७, चंद्र नक्षत्र आस्लेषा. योग शूल. चंद्र राशी कर्क भारतीय सौर २२ चैत्र शके १९४७. शनिवार, दिनांक १२ एप्रिल २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.२४, मुंबईचा चंद्रोदय २.५८, मुंबईचा सूर्यास्त ६.५५ मुंबईचा चंद्रास्त ४.०७ . उद्याची राहू काळ ३.४७ ते ५.२१, चैत्र पौर्णिमा, हनुमान जन्मोत्सव, वैशाख स्नानारंभ, छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी-तिथीप्रमाणे, जैन, फारशी आदर मासारंभ.

**|| भविष्य ||**

**मेष** : अचानक धनलाभ होण्याची शक्यता.

**वृषभ** : प्रवास करावे लागतील.

**मिथुन** : आपल्या कार्यक्षेत्रात वाद-विवाद टाळा.

**कर्क** : कार्यमग्न राहणे जरुरीचे ठरेल.

**सिंह** : महत्त्वाच्या कामात यश मिळेल.

**कन्या** : संयम ठेवणे आवश्यक आहे.

**तूळ** : गैरसमजूत होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक** : आर्थिक परिस्थिती सर्वसामान्य राहील.

**धनू** : नोकरीचे प्रश्न संपुष्टात येतील.

**मकर** : जीवनसाथीच्या नात्यात गोडवा राहील .

**कुंभ** : महत्त्वाच्या कामात यश मिळेल.

**मीन** : अचानक धनलाभ होण्याची शक्यता आहे.

### ओळखीच्या व्यक्तीची विचारपूस करणेही अशक्य झाले

आजूबाजूला काय चालले आहे? हे बघण्यासही वेळ नसणाऱ्या सामाजिक जीवनात चंगळवाद वाढत असून इतरांच्या आयुष्यातील वाईट प्रसंगी मदतीसाठी पुढे येण्यास तयारी नसते, हेच वास्तव आहे. यासंदर्भात सल्ले पुष्कळ मिळतात, परिस्थितीवर गप्पा मारतांना चिंता व्यक्त होते. पण बिकट परिस्थिती आलेल्या व्यक्तींना साधा फोन किंवा शक्य असेल, तर भेटून विचारपूसही होत नाही, हेच वास्तव आहे. सणवार साजरे होत आहेत, क्रिकेट मॅचेस रात्री जागून पाहिल्या जात आहेत, राजकारणावर चर्चा होतात पण ओळखीच्या लोकांच्या आयुष्यात काय चालले आहे ? हे विचारण्यास वेळ नाही. त्यामुळे मानसिक धीर देणे वगैरे गोष्टी तर दूरच आहेत.

**- प्र. मु. काळे,** सातपूर. नाशिक

### राज्यपालांच्या नेमणुका निवडणुकीने कराव्यात...

सत्ताधारी पक्षाच्या कृपेने मिळालेल्या राज्यपाल या पदाच्या मनमानी कारभाराला न्यायालयाने चांगलीच वेसण घातली आहे. राज्यपालांनी पदाच्या अधिकाराचा गैरवापर केल्याने या पदाची प्रतिष्ठा गमावली आहे. लोकशाहीत राज्यपाल हे पद महत्त्वाचे असून देखील राज्यपालांनी निःपक्षपातीने कामे केली नसल्याने त्यांचा आदर कमी झाला आहे. न्यायालयांनी राज्यपालांना त्यांच्या पक्षपातीपणावर शिक्कामोर्तब करुन त्यांना आपल्या घटनात्मक कर्तव्याची जाणीव करुन दिली आहे. राज्यपालांनी सत्ताधाऱ्यांना अडचणीत आणतील अशा विधेयकांवर जाणून-बुजून निर्णय दिला नाही. राज्यपालांना असे करायला भाग पाडणारे सत्ताधारी पक्ष याला जास्त जबाबदार असल्याने सत्ताधारी पक्षावर देखील न्यायालयाने कारवाई केली पाहिजे. विधेयके अनंत काळ रोखून धरण्याचा अधिकार राज्यपालांना नसतानादेखील राज्यपालांनी असे केले असल्यास यांना या पदावर राहण्याचा अधिकार नाही. अशा राज्यपालांना राज्यपाल पदावरून खाली उतरवले पाहिजे. राज्यपाल या पदाच्या नियुक्त्या केवळ पक्षीय सोयीसाठी आणि विरोधकांच्या गैरसोयीसाठीच केल्या जातात. हा प्रकार बंद करून राज्यपालांच्या नेमणुका निवडणुकीने कराव्यात. घटनात्मकतेच्या आवरणाखाली राजकारण करणाऱ्या इतर पदांची नेमणूक देखील निवडणुकीने केल्यास गैरकारभार होणार नाही.

**- विवेक तवटे,** कळवा, ठाणे

जनसंवाद

### आमदार आणि खासदार यांच्या प्रगतिपुस्तकावर जनतेचा शेरा आवश्यक

आमदार आणि खासदार निवडून आल्यावर त्यांनी आपापल्या मतदारसंघात केलेल्या विधायक कामांबाबत सामान्य जनतेने व्यक्त होऊन आपले कौतुकाचे अभिप्राय, सूचना, तक्रारी मांडण्याची ऑनलाईन सोय करून देणे गरजेचे आहे. तसेच कुठल्या आमदार / खासदारामुळे किंवा त्यांच्या नातेवाइकांमुळे किंवा आमदार / खासदारांची ओळख सांगणाऱ्यांमुळे जर सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनात काही अडचणी येत असतील किंवा त्रास होत असेल किंवा कामे व्हायला विलंब होत असेल, तर याबाबत अनुभव नोंदवण्याची सोय सामान्य नागरिकांना करून देणे गरजचे आहे. दर पाच वर्षांनी आमदार / खासदाराचे हे प्रगतीपुस्तक बघून त्यांना परत निवडून द्यायचे की नाही याबबत निर्णय घेणे जनतेला सोपे जाईल. तसेच आपण निवडून आमदार / खासदार झालो म्हणजे आपल्याला, आपल्या नातेवाईकांना, कार्यकर्त्यांना सामान्य जनतेपेक्षा कुठले विशेष अधिकार आणि कायदे प्राप्त झाले नसून जनतेच्या सेवेसाठी पाच वर्षे कार्य करायचे आहे याचे भान टिकून राहायला मदत होईल.

**- अनिकेत शेटे, पुणे**

### मुलांच्या दु:खाची भरपाई कशी होणार?

साधारण दोन आठवड्यांपूर्वी पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात गर्भवती महिलेच्या बाबतीत घडलेल्या दुर्दैवी घटनेबाबत सत्यस्थिती समोर येत आहे. २८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता रक्तस्त्राव होत असलेल्या अवस्थेत दाखल झालेल्या तनिषा भिसे नावाच्या गर्भवती महिलेची नाजूक स्थिती पाहता आणि तातडीच्या शस्त्रक्रियेची पूर्वतयारी झाली असताना देखील डॉक्टरांनी दहा लाखांच्या अनामत रकमेसाठी अडवून धरत पाच तास तिच्यावर कोणतेही उपचार न करण्याचा निर्दयपणा दाखवला आणि जुळी मुलं होण्याच्या नाजूक अवस्थेतच तिला मृत्यूच्या खाईत ढकलले! कुटुंबाकडून त्यावेळी मिळणारी तीन लाखांची रक्कम स्वीकारून डॉक्टरांनी लागलीच आपलं कर्तव्य पार पाडले असते, तर तिचा जीव नक्कीच वाचवता आला असता! असा पैशाचा हव्यासच माणूसकीला काळं फासत आहे. लोकांच्या सेवेसाठी रुग्णालये असतात हा जनतेचा आता भ्रम ठरू लागला आहे. जिथे दीन अनाथ ठरवला जात असेल, सेवेचे समाजभान, मानवता राखली जात नसेल तिथे केवळ नाव मोठं आणि लक्षण खोटं असं उद्वेगाने म्हणावं लागेल! आता राजीनामा दिलेल्या घैसास डॉक्टरांवर कारवाई होईल, २५ कोटींच्या थकीत करासाठी जप्ती येईल, ९ एकर जागा केवळ १ रुपया दराने ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्यावर घेताना, चटईक्षेत्र वाढवून घेताना, करांमध्ये सूट मिळविताना गरिबांवर मोफत उपचार करण्याचा करारनामा केला त्याची दीर्घ काळ चौकशी होईल; परंतु जुळ्या बालकांना आईपासून कायमचे पारखं करून त्यांच्यावर लादलेल्या अमाप दुःखाची भरपाई ती कशी होणार?

**- हेमंतकुमार मेस्त्री,** मनोर

### अशा वक्तव्यांवर करमणूक कर लावता आला तर...

पिंपरीत विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या सत्कार सोहळ्यात बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, आम्ही स्वार्थ पाहणारी माणसं नाही. आज २५ ते ३० वर्षे मी काम करतो आहे. मला कुणीही सांगावं की अजित पवारांनी स्वार्थासाठी काही केलं. आम्ही कायम जनहिताची कामं केली आहेत. अजित पवारांनी ज्या काही राजकीय कोलांटउड्या मारून उपमुख्यमंत्रीपद टिकवून ठेवले आहे. त्या त्यांच्या मते निश्चितच स्वार्थी भावनेतून नसाव्यात. त्यामागे जनहिताशिवाय दुसरे काय असणार? खरं तर अशी वक्तव्ये बऱ्याच राजकारण्यांकडून होत असतात. ज्यात ओठावर एक आणि पोटात दुसरेच असते. ज्यामुळे जनतेची मात्र करमणूक होते. त्यामुळे राजकारण्यांच्या अशा वक्तव्यांवर करमणूक कर लावला, तर निदान सरकारची तिजोरी तरी भरू शकते.

**- दीपक काशिराम गुंडये,** वरळी



# चटके देणारी दाहक फँटसी

भालचंद्र कुबल
पाचवा वेद



आजचं निरीक्षण थोड्या वेगळ्या प्रकारचं आहे. हा मराठी भाषा समीक्षेच्या अध्यायातील एक प्रयोग आहे असं समजायला हरकत नाही. एखाद्या स्तंभलेखकाच्या वैचारिक आणि अनुभवजन्य लिखाणास जर मर्यादा येत असतील, तर त्या परिप्रेक्षातील तज्ज्ञ मंडळींच्या सहाय्याने किंवा त्यांच्याशी चर्चा करून स्वतःचे पक्के मत मांडल्यास काय होईल? त्या तज्ज्ञांच्या अनुभवजन्य विचार मंथनातून माझा त्या कलाकृतीबाबतचा ॲप्रोच पूरक आणि सकारात्मक होऊ शकतो का? याचा अंदाज मी या प्रयोगाद्वारे केला.

बुधवार, ९ एप्रिल २०२५, वेळ सायं. ५ वाजता, स्थळ-यशवंत नाट्य मंदिर, माटुंगा, विषय - 'तोडी मिल फँटसी' या नाटकाबाबतची पत्रकार परिषद. 'तोडी मिल फँटसी' हे प्रायोगिक नाटक साधारण दोन-अडीज वर्षांपूर्वी रंगभूमीवर प्रकाशित झाले. गिरणी कामगारांच्या ऐतिहासिक संपावर भाष्य करणारे एका वेगळ्या धाटणीच्या नाटकाचे प्रायोगिक




रंगभूमीवरील पदार्पण लक्षवेधी होते. केवळ आणि केवळ गिरणी कामगारांना आर्थिक लाभ व्हावा, यासाठी दत्ता सामंतांच्या नेतृत्वाखाली पुकारला गेलेला हरताळ, आज या नेत्याच्या थडग्यासह एकेकाळी कामगारांनी वसवलेल्या गिरणगावात पहायला मिळतो. राजकारण्यांनी पद्धतशीरपणे एका दुर्बळ मानवजाती विरोधात रचलेला कट ज्यांना त्यातील धगधगते वास्तव माहीत आहे, त्यांची विचारांची कुवत रक्त गोठल्यागत निःशब्द होते. अर्थात मी हे वेगळे सांगण्याची गरज नाही कारण याबाबत जयंत पवारांपासून ते अशोक राणे यांच्यापर्यंत अनेक सृजनांनी भाष्य करुन झाले आहे.

मध्यंतरी नारायण सुर्वेंच्या साहित्य निर्मितीच्या आनुषंगाने पार पडलेल्या एकदिवसीय संमेलनातही हा विषय चघळला गेला. तर माझा एक्सपेरीमेंट हा होता की, तोडी मिल फँटसी हे नाटक असल्याने या विभागातून नावारुपास आलेल्या दोन माध्यमांच्या दिग्दर्शकांना ही पत्रकार परिषद हजर राहायला लावून त्या संदर्भात त्यांच्या कानावर पडलेल्या प्रतिक्रियांबाबत चर्चा करायची. पैकी नाटक



या माध्यमासाठी हेमंत भालेकर आणि चित्रपट माध्यमासाठी मनोहर सरवणकर हे या पत्रकार परिषदेस आवर्जून हजर राहिले. दोघांचीही जडणघडण याच गिरणगावात झालेली. संपाच्या जखमा त्यांच्या मनावर अगदी खोलवर झालेल्या आहेत. दोघांचेही अनुभव ऐकाल तर एक भयाण वास्तव आजही थरकाप उडवून देते. योगायोग म्हणावं की दुर्दैव, या संपाची पार्श्वभूमी असलेल्या जयंत पवारांच्या अधांतर या नाटकात हेमंत भालेकरांची भूमिका होती. तिचं बाब मनोहर सरवणकरांच्या बाबतीत सांगता येईल. मिलमध्ये कामाला असलेले वडील पगाराच्या दिवशी काही तरी खाऊ घेऊन येतील या आशेने मध्यरात्र जागवून काढणारे त्यांचे बालपण आणि मिल बंद पडल्यावर पोटासाठी स्वीकारायला लागलेली बाल मजुरीने रंगलेल्या काळ्या अध्यायाची पाने त्यांना उलटावीशी वाटतं नाहीत. दोघांनाही या वास्तवाचे प्रखर भान आहेच आणि त्यातून ते तोडी मिल फँटेसीकडे कसे पाहतात, हाच तो प्रयोग होता.

तोडी मिल फँटसीमध्ये वास्तवाचं मीठ थोडं कमी पडलंय. त्यामुळे फँटसी एन्जॉय करण्याच्या नादात प्रेक्षकांना वास्तवाचं भान येणार नाही, असं दोघांचही मत पडलं. प्रायोगिक नाटक म्हणून जरी आम्ही स्वीकारलं, तरी बॅक ऑफ द माईंड होत असलेल्या आमच्या वेंदनांचं हे पेन किलर ठरू शकत नाही. नव्या शतकात जन्मलेल्या नव्या पिढीच्या वाट्याला या दोघानांही आलेल्या अनुभवांच्या चटक्याना रंगभूमीवर मांडण्यासाठी असा कोणता दाहक फॉरमॅट या नाटकाने अंगीकारलाय? असा नकळत एक सवाल ते विचारतात. कारण हे नाटक यंग जनरेशनच्या म्युझिकल फॉरमॅटमधले आहे. ते खटकत नाही, पण ते त्या नाटकाचं बलस्थान असायला हवं, ते मात्र होत नाही. असा त्यांचा प्राथमिक अंदाज आहे. या संपाबाबत अनेक स्टोऱ्या रंगवल्या गेल्या. उदाहरणार्थ या गिरणगावातल्या मुलींनी आर्थिक तडजोड म्हणून वेश्या व्यवसाय स्वीकारले. लालबाग-परळ सारख्या चित्रपटात दाखवली गेलेली त्या स्वरूपाची व्यक्तिरेखा ही प्रातिनिधिक स्वरुपाची कदापिही नव्हती, ती एका पीडित मुलीची सबस्टोरी होती. कुठूनही काहीच होत नाही असं आढळल्यावर केवळ आर्थिक दबावाखाली अनेक कुटुंबाची झालेली धुळधाण या नव्या पिढीला माहिती असेल, परंतु त्यांच्या भावनांचे काय? थोडक्यात हा फँटेसीत रमण्याचा विषय नाही. गिरणी कामगारांचा हा संप आजही संपलेला नाही तरीही त्याचे पडसाद राज्यकर्ते, मिल मालक आणि त्यांचे मध्यस्थी अशा अनेकांचे उखळ पांढरे करणारा ठरलाय. त्याजागी उभे राहिलेले मॉल्स, टॉवर्स, बिझनेस सेंटर्स हीच पीडितांच्या दष्टीने फँटेसी असेल पण ती विद्रूप असेल आणि असावीच या ठाम समजुतीने आम्ही हे नाटक पाहू शकतो, हे या दोघांचेही मत ठरले. हेमंत भालेकरांनी तर एक भीती यानिमित्ताने अधोरेखित केली ती म्हणजे, ते ज्या काळी अधांतर करत होते त्याकाळी गिरणी कामगारांशी संबंधित असलेला प्रेक्षकवर्गच आमच्या नाटकाशी कनेक्ट होऊ शकला होता. बाकीच्या मुंबई-ठाणेकरांना या दाहकतेची सुतराम झळ सुद्धा लागलेली नव्हती, परिणामी मुंबई उपनगरातील व मुंबई बाहेरच्या प्रेक्षकांनी हे नाटक नाकारलं. नाटकाला अनेक पुस्कार मिळाले. नाटकातला प्रत्येकाचे करिअर घडले, मात्र त्याला लोकाश्रय मिळाला नाही हे वास्तव होते. मग या फँटेसीशी प्रेक्षक रिलेट करतील? ही प्रश्नार्थक भीती अर्थातच निर्माते दिलीप जाधव, श्रीपाद पद्माकर आणि अंकुश चौधरी या काहीतरी नवे करू पहाणाऱ्या निर्मात्यांबाबत होती. सुजय जाधव लिखित आणि विनायक कोळवणकर दिग्दर्शित ही फँटसी मात्र नव्या पिढीला जखडून ठेवेल यात शंकाच नाही.

म्हणून मग माझ्या या प्रयोगाचे अनुमान असे की नव्या पिढीने नव्या पिढीसाठी व्यक्त केलेला हा इतिहास जर मानवतेच्या वाटचालीतील आर्थिक घटकाची क्रांती ठरत असेल, तर याकडे सकारात्मक भान ठेऊन सामोरे जावे लागेल, अन्यथा आयुष्यभर केवळ नैराश्यातच जगावे लागेल. या नाटकाचे सैद्धांतिक विवेचन आणि निरीक्षण या लेखाचा उत्तरार्ध असेल.





# अमेरिकेतील माझा पहिला कार्यक्रम!

फिरता फिरता
मेघना साने



हल्ली अनेक मुली शिक्षणासाठी अमेरिकेला जातात. त्यामुळे एखादी तरुण मुलगी एकटीच अमेरिकेला निघाली असे कळले तरी फार आश्चर्य किंवा चिंता वाटत नाही. पण तीस-पस्तीस वर्षांपूर्वी तशी परिस्थिती नव्हती. १९९१ साली मी एकपात्री कार्यक्रम करण्यासाठी एकटीच अमेरिकेला निघाले तेव्हा ती फार नवलाईची गोष्ट होती. अमेरिकेला रॉचेस्टर येथील गणेशोत्सवात मला एकपात्री कार्यक्रम सादर करण्यासाठी आमंत्रण होते. त्यावेळी मोबाईल फोन वगैरेही नव्हते. रॉचेस्टर येथील माझी नातलग लता कार्लेकर यांच्याकडे मी मुक्काम करणार होते. मी न्यूयॉर्कपर्यंतचे तिकीट काढले होते. डॉ. भालचंद्र कार्लेकर मला एअरपोर्टवर घ्यायला येणार होते. ते येणार म्हणून मी इतकी निश्चिन्त होते की न्यूयॉर्कहून रॉचेस्टरला कसे जायचे असते याचा विचारही मी केला नव्हता.

माझा अमेरिकेचा न्यूयॉर्कपर्यंतचा हा पहिलाच प्रवास, तोही एकटीने, नीट पार तर पडला. विमानात माझ्या शेजारी एक मराठी मुलगा होता. तो शिकागोला जाणार होता. न्यूयॉर्कपर्यंत आम्ही अधून मधून गप्पा मारत होतो. उतरल्यावर मात्र तो कोठे गायब झाला मला कळले नाही. इमिग्रेशन वगैरे कसे करायचे ते समजून घेऊन मी त्या परीक्षेत पास होऊन सामान घेतले. ते ट्रॉलीवर टाकून गेटवर गेले. माझ्या अपेक्षेप्रमाणे डॉ. कार्लेकर मला दिसायला हवे होते. ते माझे नातलग असल्याने नक्कीच लवकर येऊन उभे असतील याची खात्री होती. मी दोन्ही गेटवर जाऊन बघितले. डॉ. कार्लेकर कुठेच दिसेनात. आता काय करावे? फोन करावा का त्यांच्या घरी? पण एअरपोर्टवरून फोन कसा करायचा असतो ते माहीत नव्हते.

एका अमेरिकन माणसाने मला डॉलरचे कॉईन दिले. बुथवरून दहा वेळा फोन करण्याचा प्रयत्न केला. पण नुसती रिंग वाजत होती. आता माझ्याकडे शेवटचा उपाय म्हणजे एअर इंडियाच्या काउंटरवर जाऊन मदत मागणे. माझे सामान ट्रॉलीवरून ढकलत बाहेरच्या मार्गाने मी त्या काउंटरला पोहोचले. तो माणूसही मराठीत बोलू लागला. मला अगदी हायसं वाटलं.

**'द्या, मी तुम्हाला फोन लावून देतो', त्याने तो लँडलाईन नंबर लावून दिला.**

'हॅलो', असा गंभीर आवाज आला. तो लता कार्लेकर यांचा होता. त्यामुळे मी हुश्श झाले. मी त्यांना सांगितले की, एअरपोर्टवर घ्यायला कुणीच आले नाही. तेव्हा गंभीर आवाजात त्या म्हणाल्या, 'कार्लेकर येणार होते. पण त्यांना अचानक हॉस्पिटलमधे ॲडमिट करावे लागले. ते सिरीयस आहेत. आम्ही सर्व हॉस्पिटलमधेच बसून होतो. मी आत्ताच घरी आले, खूपच गोंधळ झाला असावा आणि यात त्यांची धावपळ झाली असावी. मी एअरपोर्टला वाट पाहत उभी असेन याचा विचारही करायला त्यांना वेळ मिळाला नव्हता.

'बरं, मी आता कसे यायचे आहे?' मी विचारले. न्यूयॉर्क ते रॉचेस्टर हे साधारण पाचशे किलोमीटर अंतर आहे.

'तू फ्लाईटने ये. न्यूयॉर्क एअरपोर्टला रॉचेस्टरचे तिकीट मिळेल. न्यूयॉर्कवरून तुला लगार्डिया एअरपोर्टला जावे लागेल. ते न्यूयॉर्क एअरपोर्टवरून वीस मिनिटे दूर आहे. पण टॅक्सीने जा. रॉचेस्टरला तुझी नणंद वृषाली तुला घ्यायला येईल. आता आमच्याकडे उतरता येणार नाही. वृषाली तुला तिच्या घरी सोडेल आणि कामावर जाईल. तिची आजी घरी असेल.'

माझा सर्वच कार्यक्रम बदलला होता. पण मी हिम्मत हारणारी नव्हते. माझ्याकडे पाचशे डॉलर्स होते. मी तिकीट कुठे काढायचे हे शोधून काढले. तिकीट काढले, नोटा सुट्ट्या झाल्या. विमान दीड तासांनी सुटणार होते. काहीही खायला प्यायला मला वेळ नव्हता. सामान ढकलत टॅक्सीचा स्टॅन्ड शोधला. टॅक्सीचे वीस डॉलर होणार होते. टॅक्सीने एकटीनेच अमेरिकेत बाहेर पडायचे म्हणजे थोडी भीती वाटत होती. पण जायला तर हवे होते. त्याच ठिकाणी नेमका मला ओळखीचा चेहरा दिसला. तो विमानात माझ्या शेजारी बसलेला मराठी तरुण होता. तोही सामानाची ट्रॉली घेऊन उभा होता.

**'लगार्डिया एअरपोर्ट' मी त्याला विचारले.**

तो म्हणाला, 'येस, चला एकत्र जाऊ'

आम्ही असा प्लॅन केला की लगार्डियाला जायला एकच टॅक्सी करायची. वीस डॉलर्स शेअर करायचे. पण टॅक्सीवाल्याला आपण एकाच फॅमिलीचे वाटलो पाहिजे. तसेच झाले. टॅक्सीवाला उंचापुरा धिप्पाड आणि ब्लॅक होता. त्याने दोन हातात आमच्या दोन बॅगा उचलून अगदी सहज टॅक्सीत टाकल्या.

टॅक्सीत बसल्यावर मी त्या मुलाला हळूच दहा डॉलरची नोट दिली. टॅक्सीत पूर्ण वेळ आम्ही घाबरून काहीच बोलत नव्हतो. अखेर लगार्डियाला उतरलो व सामान घेऊन वेगवेगळ्या दिशेने पळालो. रॉचेस्टरचे विमान सुटणार त्या गेटला मी धावत सुटले. मला खूप तहान लागली होती. कुणाला तरी पाणी कुठे, म्हणून विचारले. त्याने दूरवर कुलरकडे अंगुलीनिर्देश केला. मी धावत जाऊन पाणी पिऊन आले. तोच माझ्या नावाचा पुकारा ऐकू आला. मी गेटवर येताच मला एका सुंदर बाईने विचारले, मेघना साने? मी म्हटले, 'येस'

**ती म्हणाली, 'Rochester flight is waiting for you'**

विमानाची वेळ झालीच होती की! ती बाई मला विमानात घेऊन गेली. विमानात गेल्यावर मला धक्काच बसला! संपूर्ण विमान रिकामे होते! अगदी शेवटच्या सीटवर एक म्हातारे जोडपे बसलेले होते. हे फ्लाईट मला कुठल्या अज्ञात स्थळी तर घेऊन जाणार नाही ना? अशी शंका येऊन मी बावरून बसले होते. पण नाही. ते मला रॉचेस्टरलाच घेऊन गेले. माझी नणंद एअरपोर्टला मला घ्यायला आली होती. पुढे आठच दिवसांनी माझा 'कोवळी उन्हे' हा कार्यक्रम रॉचेस्टरच्या महाराष्ट्र मंडळाच्या गणेशोत्सवात अगदी थाटात झाला.

# 'साबर बोंडं' हा मैलाचा दगड ठरेल

टर्निंग पॉइंट
युवराज अवसरमल



जयश्री जगताप या अभिनेत्रीने आपल्या अभिनयाच्या जोरावर या क्षेत्रात आपलं अस्तित्व प्रस्थापितं केलं आहे. जिगीषा व अष्टविनायक निर्मित 'भूमिका' या नाटकामध्ये तिची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

नागपूर जिल्ह्यातील निवळी गावात तिचे शालेय शिक्षण झाले. तिथे सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये तिने भाग घेतला. मुरुड येथील संभाजी कॉलेजमध्ये तीच शिक्षण झाले. पुढे युथ फेस्टिवलमध्ये तिने अनेक एकांकिकेमध्ये काम केले. नंतर तिने एम. ए. बी. एड. केलं आणि बी.एड. कॉलेजमध्ये प्राध्यापिका म्हणून काम केले. नंतर तिचे अभिनेते उमेश जगतापशी लग्न झालं. मुंबईला आल्यावर तिला प्रश्न पडला की, काम करायचं की अभिनयाच्या क्षेत्रात करिअर करायचं. तिने अभिनयाच्या क्षेत्रात करिअर करायचे ठरविले.

आविष्कार संस्थेत तिने अभिनयाच्या कार्यशाळेत काम केलं. त्यानंतर माऊली, बंदीशाळा, सोयरिक या चित्रपटामध्ये काम केले. कोरोनाचे आगमन झाले. युगंधर देशपांडेनी कोरोना थिएटर सुरू केलं होतं. त्यामध्ये तिने तिचे व्हीडिओ व अभिवाचन पाठविले. ते पाहून तिला 'साबर बोंडं' हा चित्रपट मिळाला. त्यामध्ये आईची भूमिका तिने केली होती. आई व मुलाचे भावनिक बंध त्यामध्ये प्रेक्षकांना पाहायला मिळेल. सुमन हे तिच्या व्यक्तिरेखेचे नाव होते. परदेशात या चित्रपटाला ग्रँड ज्युरी ॲवॉर्ड मिळाले. या चित्रपटाच्या निमित्ताने तिची अमेरिकावारी देखील झाली. या चित्रपटाचे अमेरिकेत स्क्रिनिंग झाले. हा चित्रपट व अभिनेते उमेश जगताप यांच्याशी झालेलं लग्न हा तिच्या आयुष्यातील टर्निंग पॉइंट ठरला. हा चित्रपट अजून रिलीज झाला नाही. हा चित्रपट मैलाचा दगड ठरेल. त्यानंतर तिचं आयुष्य बदलत गेलं.

तिला भरपूर कामे मिळू लागली. सुख म्हणजे नक्की काय असते या मालिकेत तिने जोगतीण साकारली होती. आई तुळजाभवानी या मालिकेत देखील तिने काम केले. दगड आणि माती या प्रायोगिक नाटकात तिने काम केले. खरंतर या नाटकातील तिचे काम पाहून दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णीनी तिला भूमिका या नाटकातील व्यक्तिरेखेविषयी विचारले होते. कालसूत्र, पेट पुराण या वेबसीरिजमध्ये देखील तिने काम केले आहे.

भूमिका या नाटकात तिची मोलकरणीची भूमिका आहे. तिचं काहीतरी म्हणणं असतं, तिच्या बोलण्यामुळे इतरांच्या विचारांमध्ये बदल होतो.

हे नाटक पाहिल्यानंतर प्रेक्षक काही ना काही विचार घरी घेऊन जातील. या चित्रपटाचे दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी सोबत काम करताना भरपूर गोष्टी ती शिकली. दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी हे खूप अभ्यासू, शिस्तप्रिय आहेत व मोठ्या प्रेमाने त्यांनी हे नाटक बसवले असल्याचे तिने स्पष्ट केले. सचिन खेडेकर, समिधा गुरू, जाई, अतुल या साऱ्यांसोबत काम करताना भरपूर शिकायला मिळते. सचिनजींनी तिला संवादाविषयी व हालचालींविषयी मार्गदर्शन केले.



जयश्री जगताप

# रंगभूमीवरचे 'कुटुंब' आणि बरेच काही...

राजरंग
राज चिंचणकर



निर्माते म्हणून प्रशांत दामले, लेखक म्हणून संकर्षण कऱ्हाडे, अभिनयाची बाजू सांभाळणाऱ्या ज्येष्ठ रंगकर्मी वंदना गुप्ते यांच्यासह तन्वी मुंडले, अमोल कुलकर्णी व संकर्षण कऱ्हाडे हे कलावंत, दोन दशके प्रायोगिक रंगभूमीवर कार्यरत असलेले दिग्दर्शक अमेय दक्षिणदास अशी सगळी टीम सध्या रंगभूमीवर 'कुटुंब किर्रतन' हे नाट्य घडवत आहे. आगळावेगळा असा विषय घेऊन रंगभूमीवर आलेले हे 'कुटुंब' सध्या रसिकांच्या पसंतीस उतरत आहे. त्या निमित्ताने, या कुटुंबासोबत साधलेला खास संवाद...




**नाटकाची आवड असणे महत्त्वाचे...**
**प्रशांत दामले (निर्माते):-**

मी वंदना गुप्तेसोबत 'श्री तशी सौ' या नाटकात काम केले होते. पण मी निर्माता झाल्यानंतर तिच्यासोबत काम करायची संधी आता 'कुटुंब किर्रतन' या आमच्या नाटकाच्या निमित्ताने मिळाली आहे. संकर्षण तर खूप नशीबवान आहे, कारण त्याला वंदनासोबत काम करताना खूप काही शिकायला मिळत आहे. या दोघांसह आमची कलाकारांची उत्तम टीम नाटकात काम करत आहे. त्यामुळे निर्माता म्हणून मला या नाटकाबद्दल कुठलीही धास्ती वाटत नाही. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने ही मंडळी काम करत आहेत. मुळात नाटकात काम करण्याची आवड असणे महत्त्वाचे असते. लेखक म्हणून संकर्षण आता छान लिहायला लागला आहे आणि वंदनाने त्याला शाबासकी दिली आहे. तिने एखाद्याला शाबासकी देणे खूप अवघड आहे. आमच्या या नाटकाला रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

**खूपच छान अनुभव...**
**अमेय दक्षिणदास (दिग्दर्शक) :-**

गेली २० वर्षे मी प्रायोगिक रंगभूमीवर काम करत आहे. स्पर्धा आणि स्पर्धाबाह्य असे बरेच उपक्रम मी केलेले आहेत. प्रायोगिक रंगभूमीवरचा २० वर्षांचा अनुभव घेतल्यानंतर व्यावसायिक असे हे माझे पहिलेच नाटक आहे. या पहिल्या नाटकासाठी प्रशांत दामले यांच्यासारखा दिग्गज निर्माता, वंदनाताईंसारखी सीनियर अभिनेत्री, संकर्षण, तन्वी, अमोल यांच्यासारखे यंग जनरेशनचे कलाकार अशी मंडळी आहेत आणि त्यांच्यासोबत काम करण्याचा अनुभव खूप वेगळा आणि छान आहे. आम्हा सर्वांचे कष्ट फळाला येत आहेत आणि प्रेक्षकही नाटक एन्जॉय करत आहेत.

**बऱ्याच गोष्टी पहिल्यांदाच...**
**संकर्षण कऱ्हाडे (लेखक व अभिनेता):-**

आमचे हे नाटक म्हणजे 'प्रशांत दामले फॅन फाऊंडेशन'ची निर्मिती आहे. मी लेखक आणि प्रशांत दामले निर्माते असलेले असे हे आमचे चौथे नाटक आहे. या नाटकाच्या निमित्ताने बऱ्याच गोष्टी पहिल्यांदाच घडत आहेत. अमेय दक्षिणदास हे आमचे जे दिग्दर्शक आहेत, त्यांनी प्रायोगिक नाटकासाठी बरीच वर्षे काम केले आहे आणि त्यांचे हे पहिलेच व्यावसायिक नाटक आहे. तन्वी मुंडले हिचे सुद्धा हे पहिलेच व्यावसायिक नाटक आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे वंदना गुप्ते यांच्याबरोबर मला पहिल्यांदाच काम करायला मिळत आहे. या नाटकातला चौथा कलाकार म्हणजे आमच्या 'तू म्हणशील तसं!' नाटकातला अमोल कुलकर्णी, अशी आम्हा सर्वांची छान भट्टी जमून आलेली आहे.

**वेगळ्या धाटणीची भूमिका...**
**वंदना गुप्ते (ज्येष्ठ रंगकर्मी):-**

या नाटकाच्या निमित्ताने मी प्रशांत दामलेच्या प्रॉडक्शनमध्ये काम करत आहे. प्रशांत दामले म्हणजे 'ऑल इन वन' निर्माता आहे, उत्तम अभिनेता आहे आणि त्याची निर्मिती पण छान असते. त्यामुळे त्याने या नाटकासाठी मला विचारले आणि मी साहजिकच तयार झाले. नवीन नाटकाकडे माझा ओढा होताच. त्यात चांगले कलाकार आणि चांगली भूमिका मिळणे म्हणजे सोन्याहून पिवळे! संकर्षण नाटकाचा लेखक आहे. त्याला लेखनाची आणि संवादांची उत्तम जाण आहे. यातली माझी भूमिकाही चांगली आहे. खूप दिवसांनंतर मला विनोदी प्रकारची भूमिका करायला मिळत आहे. लोकांना हसवणे खूप कठीण गोष्ट आहे, पण ते चॅलेंज मी पुन्हा एकदा स्वीकारले आहे.

**अभिनयाचा क्लास...**
**तन्वी मुंडले (अभिनेत्री):-**

'कुटुंब किर्रतन' हे आमचे नवीन नाटक रंगभूमीवर सुरू आहे आणि हे माझे पहिलेच व्यावसायिक नाटक आहे. प्रशांत दामले सरांची टीम आहे, उत्तम कलाकार आहेत, अमेय दक्षिणदास आमचे दिग्दर्शक आहेत. संकर्षण कऱ्हाडेने खूप छान नाटक लिहिलेले आहे आणि यात तो कामही करत आहे. वंदना गुप्ते या खूप कमाल अभिनेत्री आहेत आणि मला त्यांच्यासोबत काम करायला मिळत आहे. अशा मंडळींसोबत माझे पहिले नाटक आले आहे. या सर्व मंडळींबरोबर काम करणे म्हणजे अभिनयाचा रोजचा क्लास असल्यासारखे आहे.

**उत्तम नाटकातले काम...**
**अमोल कुलकर्णी (अभिनेता):-**

'प्रशांत दामले फॅन फाउंडेशन'चे हे मी दुसरे नाटक करत आहे. संकर्षणने लिहिलेले असे हे माझे दुसरे नाटक आहे. त्याचा सहकलाकार म्हणूनही मी दुसरे नाटक करत आहे. वंदना गुप्ते यांच्याबरोबर मला पहिल्यांदाच रंगभूमीवर काम करायला मिळत आहे. यातल्या एका मुलीच्या वडिलांची भूमिका मी करत आहे आणि यात अजून एक सरप्राईज आहे, जे प्रेक्षकांना नाटक पाहिल्यानंतर कळेल. उत्तम निर्मिती, लेखन आणि दिग्दर्शन असलेले आमचे हे नाटक आहे.



# 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' आता ॲमेझॉन प्राइमवर

देवाचं घर म्हणजे काय? ते नक्की कुठे असतं? या एका लहान मुलीला पडलेल्या प्रश्नाचं उत्तर अतिशय रंजकपणे 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' या चित्रपटातून दाखविण्यात आले आहे. ३१ जानेवारीला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने रसिक प्रेक्षकांची चांगलीच वाहवा मिळवली. आता हा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मच्या ॲमेझॉन प्राइमवर उपलब्ध झाला असून तिथेदेखील या चित्रपटाने अल्पावधीतच आपली उत्तम मोहोर उमटवून ट्रेंडींगवर आला आहे.




'मुक्काम पोस्ट देवाचं घर' या चित्रपटातून मनाला भिडणारी गोष्ट दाखविण्यात आली आहे. एका लहान मुलीला पडलेल्या प्रश्नाचं काय उत्तर असेल याचा शोध या चित्रपटातून घेण्यात आला आहे. तसेच दरम्यान तिच्या आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींची जोडही देण्यात आली आहे. अतिशय हलक्या-फुलक्या पद्धतीनं ही गोष्ट उलगडणार असून सहकुटुंब हा चित्रपट पाहता येणारा असा हा चित्रपट आहे.

महेश कुमार जायसवाल, कीर्ती जायसवाल हे या चित्रपटाचे निर्माते आहेत, तर वैशाली संजू राठोड, सचिन नारकर, विकास पवार हे सहनिर्माते आहेत. चित्रपटाची कथा आणि दिग्दर्शन संकेत माने यांचे असून संकेत माने, सुमित गिरी यांनी पटकथा लेखन, सुमित गिरी यांनी संवादलेखन तर मंगेश कांगणे यांनी लिहिलेल्या गीतांना चिनार - महेश यांचे श्रवणीय संगीत दिग्दर्शन या चित्रपटाला लाभले आहे.

# अद्वैत मसूरकर दिग्दर्शित 'छबी' चित्रपटाचा टीझर लाँच

कोकणात फोटोग्राफी करणाऱ्या फोटोग्राफरला आलेल्या गूढरम्य अनुभवाची थरारक गोष्ट छबी या चित्रपटातून उलगडणार आहे. या चित्रपटाचा अतिशय रंजक टीझर लाँच करण्यात आला असून, छबी हा चित्रपट ९ मेपासून सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

केके फिल्म्स क्रिएशन, उप्स डिजिटल एंटरटेन्मेंट यांनी 'छबी' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. जया तलक्षी छेडा निर्माता आहेत. चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन अद्वैत मसूरकर यांचं असून त्यांचा दिग्दर्शक म्हणून पहिलाच चित्रपट आहे. चित्रपटात ध्रुव छेडा, सृष्टी बाहेकर, अनघा अतुल, रोहित लाड, ज्ञानेश दाभणे, अपूर्वा कवडे या नव्या दमाच्या कलाकारांसह अभिनेता समीर धर्माधिकारी, अभिनेते मकरंद देशपांडे, अभिनेत्री शुभांगी गोखले, राजन भिसे, जयवंत वाडकर, संकेत मोरे, संजय कुलकर्णी, लीना पंडित असे अनुभवी कलाकार आहेत. त्यामुळे चित्रपटाची अभिनयाची बाजू खणखणीत आहे यात शंका नाही.



फोटोग्राफी स्पर्धेसाठी एक तरुण फोटोग्राफर कोकणातल्या गावात फोटो काढतो. मात्र त्या फोटोमध्ये कुणीच नसतं. हे असं का झालं याचा नाट्यमय शोध 'छबी' या चित्रपटात आहे. गूढरम्य आणि नावीन्यपूर्ण कथानक, परिणाकारक पार्श्वसंगीत यामुळे हा टीझर प्रेक्षकांना गुंतवून ठेवतो, तसंच चित्रपटाविषयी उत्सुकताही वाढवतो. आजवर चित्रपटांमधून फोटोग्राफरची, एखाद्या फोटोची गोष्ट फारशी मांडली गेलेली नाही.

अशा कथानकाला गूढरम्यतेची पार्श्वभूमी असल्यानं 'छबी' हा सध्याच्या चित्रपटांमध्ये नक्कीच वेगळा प्रयत्न ठरणार आहे. या गूढरम्यतेचा अनुभव मोठ्या पडद्यावर घेण्यासाठी आता ९ मेपर्यंत वाट पाहावी लागणार आहे.

# बीडच्या जिल्हा क्रीडांगणाच्या स्विमिंग पूलमध्ये युवकाचा बुडून मृत्यू !

दुर्घटना

## साडेसहा फुटात अठरा वर्षीय इंजीनियरिंगचा युवक बुडाला

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड : जिल्हा क्रिडांगणा मधील स्विमिंग पूल मध्ये उदगीर येथील युवकाचा बुडून दुर्दैव मृत्यू झाल्याची घटना दिनांक १२ एप्रिल रोजी दुपारी दोनच्या दरम्यान घडली. शासकीय इंजिनिअरिंग महाविद्यालयात इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत असलेला १८ वर्षीय युवक हा मूळ उदगीर येथील असल्याची माहिती मिळाली असून मित्रासोबत दुपारी जिल्हा क्रीडांगणामधील स्विमिंग पूल मध्ये तो पोहण्यासाठी गेला होता. चार फूट खोल पाण्यात सर्व मित्र पोहत असताना सतीश कांबळे हा पुढे गेला व सहा फूट असलेल्या पाण्यात तो बुडाला. उन्हाळ्याचे दिवस असल्याने येथील स्विमिंग पूल मध्ये पोहणाऱ्यांची संख्या मोठी असते मात्र हा युवक हाकेच्या अंतरावर बुडत असताना इतर मित्र व येथील प्रशिक्षक काय करत होते असा सवाल उपस्थित होत असून या स्विमिंग पूल चे कंत्राटदार फक्त लोकांकडून पैसे वसूल करण्यासाठीच आहे का ? पोहता येत नसल्याने अनेक युवक लहान मुले या ठिकाणी प्रशिक्षणासाठी येतात मात्र स्विमिंग पूल मध्येच एखाद्या युवकाचा जीव जात असेल तर याला जबाबदार कोण ? बीड नगरपालिकेने स्विमिंग पूल चालवण्यासाठी दिले असता प्राविण्य प्राप्त प्रशिक्षक नेमण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराला दिली नाही का ? इंजीनियरिंग अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या एका युवकाचा



जीव स्विमिंग पूल मध्ये गेल्याने या स्विमिंग पूल ला कायम सील करत संबंधित कंत्राटदार व या ठिकाणी नियुक्त असलेले प्रशिक्षक तथा नगरपालिका प्रशासन यांच्यावर कारवाई करण्याची मगणी होत आहे .

या प्रकरणात मुलाच्या आई वडील संध्याकाळी नऊच्या दरम्यान जिल्हा रुग्णालयात पोहोचले यावेळी नातेवाईकांनी स्विमिंग पूल मध्ये मुलगा बुडून मेला याबाबत शंका निर्माण केली. संबंधित स्विमिंग पूल चालक यांच्यासह प्रशिक्षक यांच्यासह या घटनेला जबाबदार असणाऱ्या सर्व व्यक्ती विरोधात गुन्हा नोंद करण्याची मागणी केली असून जोपर्यंत गुन्हा नोंद होत नाही तोपर्यंत विच्छेदन करणार नसल्याचे मृत मुलाच्या आई वडिलांनी म्हटल्या आहे

सतीश कांबळे राहणार कराड तालुका उदगीर जिल्हा लातूर हा बीड येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत होता दिनांक १२ एप्रिल रोजी दुपारी दोनच्या दरम्यान तो इतर मित्रासह जिल्हा क्रीडांगणावर असलेल्या स्विमिंग मध्ये होण्यासाठी गेला या ठिकाणी चौघा मित्राने प्रती तास दीडशे रुपये प्रमाणे तिकीट घेत स्विमिंग पूल भागात प्रवेश केला. यावेळी इतर मित्र चार फुट पाण्यात होत असताना संतोष कांबळे हा सहा फूट पाण्यात गेल्याने त्याचा बुडून जागेवरच मृत्यू झाला. जिल्हा क्रीडांगणावर असलेल्या स्विमिंग पूल येथे तब्बल पाच प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक असताना सतीश कांबळे असा प्रश्न उपस्थित होत असून स्विमिंग पूल मध्ये शेवाळ व पाणी हिरवे झाल्याने त्याला पाहिले नाही असे परिसरात होती. मात्र या प्रकरणामुळे प्रशिक्षण घेण्यासाठी ज्या स्विमिंग पूल मध्ये लहान मुले व युवक प्रशिक्षणसाठी येतात मात्र याच ठिकाणी एका गरीब घरातील मुलाचा दुर्देवी मृत्यू झाला. या प्रकरणात कंत्राटदार यांच्यासह नगरपालिका पान २ वर

### पँथर सेनेचा पाठपुरावा - नितीन सोनवणे

सतीश कांबळे याचा दुर्देवी मृत्यू झाल्याची माहिती मिळताच पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी थेट जिल्हा रुग्णालय गाठत सर्व परिस्थितीची माहिती घेतली. उदगीर तालुक्यातील रहिवाशी असलेल्या सतिश कांबळे यांच्या कुटुंबीयांना संपर्क करत त्यांना तातडीने बीड येथे बोलवण्यात आले. रात्री उशिरा कांबळे यांचे आई वडील व नातेवाईक येथील जिल्हा रुग्णालयात आले यानंतर त्यांनी संबंधित व्यक्ती विरोधात गुन्हा नोंद करण्याची मागणी केली. ही मागणी त्यानंतर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी लावून धरली असून गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत विच्छेदन करणार नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### सतीशकांबळे हा एकुलता एक

उदगीर तालुक्यातील करलखेल या गावाचे रहिवासी असलेले सतीशकांबळे अभ्यासक्रमात अत्यंत हुशार होता शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात त्याचा नंबर लागला तो शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या हॉस्टेलमध्ये राहत होता. शनिवारी दुपारी मित्रासोबत पोहण्यासाठी सतीश कांबळे हा जिल्हा क्रीडांगणातील स्विमिंग पूल येथे गेला व तेथेच त्याचा बुडून दुर्देवी मृत्यू झाला विशेष म्हणजे चार मुली नंतर सतीश कांबळे हा एकुलता एक मुलगा असल्याने बीड जिल्हा रुग्णालय परिसरात सतिश कांबळे यांच्या मृत्यू च्या घटनेने हळहळ व्यक्त करण्यात येत होती.

## साबला येथे जयंती महोत्सव

### अभिवादन:महात्मा ज्योतिबा फुले जयंती

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील मौजे साबला येथे महात्मा ज्योतीबा फुले सार्वजिक जयंती महोत्सव, साबला यांच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली . या कार्यक्रमाची सुरुवात समाजसेवक नरहरी काकडे व चेरमन उत्तमराव काकडे यांच्या हस्ते क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले .यावेळी समाजसेवक नरहरी काकडे यांनी सांगितले की .

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांनी . सर्व जाती धर्मातील मुला मुलींना शिक्षण मिळाले पाहिजे . यासाठी पुणे येथील भिडेवाडा या ठिकाणी पहिली शाळा सुरू केली . तसेच अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य केले . सत्यशोधक समाजाची स्थापना केली . जातीभेद नष्ट केले . छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधून पहिली शिवजयंती साजरी केली . छत्रपती शिवाजी महाराज पान २ वर



## अखेर अमरण उपोषण सोडले

### सामंजस्य:डॉ.बछीरेंची मध्यस्थी यशस्वी ठरली



पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:विकास कामात भ्रष्टाचाराच्या विरोधात कोलखेडा वढव येथे सहा दिवसापासून आमरण उपोषण सुरू होते आज मागण्या मान्य होऊन डॉ. गोपाल बछीरे जिल्हा संघटक शिवसेना उबाठा यांच्या हस्ते लिंबू पाणी देऊन उपोषणाची सांगता

वढव कोलखेडा येथील १८ नागरी विकास कामात भ्रष्टाचार झाला त्याविरोधात न्यायासाठी ग्रा.स. मंगेश मोरे, ग्रां.स.सुधाकर घोडके, ग्रां. स. सौ तारामती जायभाये हे सहा दिवसापासून आमरण उपोषणास बसले होते वाशीम येथील पान २ वर

## कळंबमध्ये येडेश्वरी यात्रेला प्रारंभ

### परंपरा:व्यावसायिक येरमाळ्यात झाले दाखल

पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब: तालुक्यातील येरमाळा येथील श्री येडेश्वरी यात्रा शनिवारपासून सुरू झाल्याने यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी यावर्षी जिल्हा प्रशासनाने विविध उपायोजना केले आहेत येडेश्वरी यात्रेला राज्यसह बाहेर राज्यातील भाविक भक्त पारंपारिक चुना वेचण्याच्या कार्यक्रमाला लाखोच्या संख्येने सहभागी होत असतात शनिवारी पहिल्या पौर्णिमेलाच भाविक भक्ताने मोठी गर्दी केली असून यंदाची यात्रा मोठ्या प्रमाणात भरेल असे दिसून येत आहे भाविकांसह यात्रेसाठी विविध व्यावसायिक दाखल झाले असून हॉटेल्स, कोल्ड्रिक्स,ज्यूस,आईस्क्रीम, रसवंती, फळे,किराणा,नारळ,



मिठाईवाले,भांडी, प्रसादाचे, दागिने खेळणी चे दुकाने तसेच मनोरंजनाचे रहाटपाळने,ब्रेक डान्स, घसरगुंडी असे विविध व्यावसायिक यात्रेसाठी दाखल झाले आहेत.वाहतूक कोंडी होऊ नये शिवाय गर्दीचा फायदा घेऊन पाकिट मारी व महिला भाविकांचा अंगावरील दागिने चोरीच्या प्रकरणाला आळा घालण्यासाठी येडेश्वरी मंदिर रस्ता,पालखी मार्ग,गावातील मुख्य रस्ता,चौक व आमराई परिसरात व इतर ठिकाणी सिसीटिव्हि कॅमेरे बसविण्यात आले असून दरवर्षी प्रमाणे यंदाही यात्रा सिसीटिव्हि कॅमेरात कैद होणार आहे पहिल्याच पान २ वर

## बीडमध्ये आज भिम संगीत रजनी

### जयंती:उपस्थित राहण्याचे समितीचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड: डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने ४ ते १४ एप्रिल या कालावधीत जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने बीड शहरातील सेवादल मैदान येथे आज रविवार (दि.१३) एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता भव्य संगित रजनीचे आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमास जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीने केले आहे.

बीडच्या जयभीम महोत्सवात दरवर्षी विविध कार्यक्रमांची रेलचेल असते. त्या अनुषंगाने महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक साजन बेंद्रे यांचा संगित रजनी कार्यक्रम होणार आहे. तसेच रात्री १२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून समताज्योत रॅली काढण्यात येणार आहे. सदरील रॅली डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा इथपर्यंत काढली जाणार आहे. राज्याला आदर्श निर्माण करुन देणारी भिम जयंती बीडमध्ये साजरी केली जाते. ही भीम जयंती स्वबळावर साजरी होते.एकूण चौदा दिवस चालणारा हा जयभीम महोत्सव नावारुपाला आलेला आहे.एक आदर्श जयंती कशी असावी असा पायंडा भिम जयंतीने निर्माण केला आहे. दरम्यान आज पार पडणाऱ्या कार्यक्रमांना आंबेडकरी जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

## २१० जणांची मोफत आरोग्य तपासणी

### धोरण: आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचा उपक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जागतिक आरोग्य दिनानिमित्त आरोग्य संघटनेच्या वतीने १ ते ७ एप्रिल हा आठवडा जागतिक अंधत्व जागृती सप्ताह म्हणून साजरा केला जातो. त्याचाच एक भाग म्हणून आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ.आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक ७ एप्रिल सोमवार रोजी आरोग्य दिनानिमित्त मोफत मोतीबिंदू निदान व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन आदित्य आयुर्वेद महाविद्यालय व आदित्य हॉस्पिटल यांच्या वतीने करण्यात आले होते. या शिबिरात सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत तब्बल २१० रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करून मोतीबिंदूचे निदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन आदित्य दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हिमांशू यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम



आदित्य आयुर्वेद महाविद्यालय व आदित्य हॉस्पिटल यांच्या वतीने रुग्णांना दर्जेदार सुविधा पुरवल्या जात आहेत. रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा म्हणून येथील डॉक्टर विद्यार्थी सेवा करत असल्याने रुग्णांची विश्वासहार्ता वाढत असल्याचे मोफत तपासणी शिबिराचा २१० रुग्णांनी घेतलेल्या लाभावरून दिसून येत आहे.
–डॉ.आदिती सारडा, संचालिका आदिती शिक्षण संस्था, बीड

भुतडा हे उपस्थित होते. व्यासपीठावर आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, आंबाजोगाईतील नेत्र तज्ज्ञ डॉ. कोमल शर्मा, आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, पान २ वर

## ...म्हणून शिक्षणाची दारे खुली झाली

### सुरेश हात्ते:महात्मा ज्योतिबा फुले जयंती

पुण्यभूमी प्रतिनिधी

तलवाडा:गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी करण्यात आली या महात्मा फुले सार्वजनिक जयंतीच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अँड सुरेश हात्ते होते यांची उपस्थिती होती हात्ते म्हणाले की महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून मोठी चळवळ उभी केली त्यामुळेच तुमच्या आज देशात मुलींनी शिक्षणात प्रगती केली असे मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाला उपस्थित ग्रामसेवक पाटील, सरपंच विष्णू हात्ते, उपसरपंच आक्रम सौदागर,माजी जिल्हा परिषद सदस्य युवराज डोंगरे, माजी पंचायत समिती सदस्य शाम कुंड, माजी पंचायत समिती सदस्य बाबासाहेब आठवले, संचालक गणपत नाटकर, समता परिषदेचे तालुकाध्यक्ष बापू गाडेकर, लहुजी साळवे बहुजन क्रांती सेने जिल्हाध्यक्ष दादाराव रोकडे, त्वरितादेवी विश्वस्त मंडळाचे सचिव राजाभाऊ खिस्ते माजी समाज कल्याण सभापती गीताराम डोंगरे ,माऊली डोंगरे, आनंद डोंगरे, मदन करडे, नजिर भाई कुरेशी, व गावातील सर्व नागरिक उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक विजय डोंगरे सर विनोद आठवले, अरुण डोंगरे, रमेश आठवले,यांनी परिश्रम घेतले तर कार्यक्रमाचे प्रस्ताविक सुरेश गांधले यांनी केले तर आभार समता परिषदेचे तालुकाध्यक्ष बापू गाडेकर यांनी मांनले.

उपक्रम

## नवोदित चित्रकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

# जयभीम महोत्सवात चित्रकला स्पर्धा





पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:शहरातील सामाजिक न्याय भवन येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने ४ ते १४ एप्रिल या कालावधीत जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने शनिवार (दि.१२) रोजी महापुरुष भव्य चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या चित्रकला स्पर्धेला अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त शिक्षण संचालक शशिकांत हिंगोणीकर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून उप शिक्षणाधिकारी पान २ वर

### यांच्या हस्ते पारितोषिक वितरण

सामाजिक न्याय भवन येथे पार पडलेल्या महापुरुष चित्रकला स्पर्धेचे पारितोषिक वितरण, वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, पुरुषोत्तम वीर, विशाल सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.

## माथेफिरुने लावली आग

### नुकसान:५० हजाराचे ड्रीप जळून खाक



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील आरणगाव येथील शिरसाट प्रशांत शिवाजीराव यांच्या शेतात अज्ञात माथेफिरूने दुपारी ११ ते ०१ च्या दरम्यान वाळलेल्या गवतामध्ये आग लावून पन्नास हजाराचे ड्रीप जाळले.याबाबत सविस्तर वृत्त असे की,अरणगाव येथील शिरसाट प्रशांत शिवाजीराव यांच्या शेतामध्ये ऊसाला पाणी देण्यासाठी ठिबक सिंचन करण्यात आले होते. शेतातील उसाच्या खोडाला माती लावण्यासाठी अडसर ठरत असलेल्या ठिबकला शेतातून बाहेर मोकळ्या जागेत काढण्यात आले होते अशातच अज्ञात माथेफिरूने वाळलेल गवत पेटवून देऊन पान २ वर